लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय
फक्त ५१०००/- रु.
जेवणासह (अटी लागू)
• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय
श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com

पाहिजेत
पत्रकार, व्हिडीओ एडिटर, स्वागतिका, टेली मार्केटिंग, मार्केटिंग प्रतिनिधी पाहिजेत. पगार 5 ते 25 हजार, शिकावूंसाठीही संधी, कागदपत्रासह भेटा
फोन- 9657069069, 0217-3550592
पत्ता:- F-3 वृंदावन पार्क, होटगी रोड सोलापूर

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १८ वे, अंक २४६ वा | बुधवार, दि. १५ मे २०२४ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# कांद्याचे दर घसरले, मार्केट यार्डात आवक कमी, नासक्या कांद्यामुळे शेतकऱ्यांना फटका

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत कांद्याचे दर घसरले आहेत. काही दिवसांपूर्वी अक्कलकोट तालुक्यातील एका शेतकऱ्याला २४ पोते कांदा विक्री करून फक्त ५५७ रुपये मिळाले होते. सोलापूर मार्केट यार्डात कांद्याची आवक देखील कमी झाली आहे. व्यापाऱ्यांशी संवाद साधून खरी परिस्थिती जाणून घेतली असता, नासलेला कांदा विक्रीसाठी आल्याने कांद्याला भाव मिळत नसल्याची माहिती मिळाली.



### मार्केट यार्डात नासलेल्या कांद्यामुळे दुर्गंधी

सोलापूर मार्केट यार्डात नासलेल्या कांद्याला योग्य भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांनी यार्डातच जागोजागी कांदा फेकला आहे. त्यामुळे सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत कांद्याची भयंकर दुर्गंधी पसरली आहे. वाढत्या तापमानाचा फटका शेतकऱ्यांच्या कांद्याला बसत आहे. सोलापुरात दोन महिन्यांपासून ४० अंश सेल्सिअस पेक्षा अधिक तापमान आहे. त्यामुळे कांद्याला पाणी सुटत आहे. पाणी सुटलेला कांदा कुणीही खरेदी करत नाही त्यामुळे शेतकरी परगावारून येऊन व्यापाऱ्याच्या लिलाव पद्धतीवर खापर फोडत आहे.

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमधील अजहर बागवान यांनी माहिती देताना सांगितलं, की उत्तम दर्जाच्या कांद्याला मागणी आहे, मात्र शेतकरी नासका कांदा विक्रीसाठी आणत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना योग्य भाव मिळत नाहीये. उत्तम दर्जाच्या कांद्याला आजही २० ते २५ रुपये प्रतिकिलो भाव मिळतो. मात्र उसात लागवड केलेला कांदा आणला जात आहे. उसात लागवड केलेला कांदा हा लवकर खराब होतो. तसंच सोलापूरच्या वाढत्या तापमानामुळे कांद्याच्या पाकिटात पाणी सुटत आहे आणि दुर्गंधी येत आहे. नासलेला कांदा आणि दुर्गंधीयुक्त कांद्याला भाव मिळत नाही. सोलापूर मार्केट यार्डात येणारे परराज्यातील अन्य व्यापारी देखील हा कांदा खरेदी करत नाहीत.

### योग्य आणि उत्तम दर्जाचा कांदा आणा योग्य भाव देऊ, व्यापाऱ्यांचे आवाहन

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमधील व्यापारी अजहर बागवान यांनी शेतकऱ्यांना आवाहन केले आहे. चांगला आणि उत्तम दजार्चा कांदा आणा आम्ही योग्य भाव देऊ. उसात लागवड केलेला कांदा लवकर खराब होत आहे. सोलापूर मार्केट याडार्तील कांदा व्यापारी शेतकऱ्यांकडून खरेदी केलेला कांदा आंध्रप्रदेश, तामिळनाडू, केरळ, ओडिशा या राज्यात निर्यात करतात. या राज्यात कांदा पाठवताना जवळपास पंधरा दिवसांचा कालावधी लागतो. पंधरा दिवसांत कांदा खराब होत आहे आणि तेथील व्यापारी कांद्याची रोकड देखील देत नाही, त्यामुळे खराब कांद्याला सोलापूर मार्केट यार्डात भाव मिळत नाही.

नासलेला कांदा परराज्यात पाठवला तर तेथील व्यापारी नासक्या कांद्याचे पैसे देखील देत नाही, अशी खंत सोलापूर मार्केट यार्डातील व्यापाऱ्यांनी व्यक्त केली.

# मनोज जरांगेंनी पुन्हा उपसलं उपोषणांचं हत्यार

## 'सगेसोयरे'साठी पुन्हा सुरू करणार आंदोलन

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** देशासह राज्यभरात लोकसभा निवडणुकांची जोरदार तयारी सुरू आहे. आत्तापर्यंत चार टप्प्यातील मतदार प्रक्रिया पुर्ण झाली आहे. सर्वत्र राजकीय पक्षांचा निवडणुकीसाठी प्रचार सभांचा धडाका सुरू आहे.



यादरम्यान, मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा उपोषणाला बसणार असल्याचं जाहीर केलं आहे. 'सगेसोयरे'साठी पुन्हा उपोषण आणि आंदोलनाला सुरूवात करणार असल्याचं मनोज जरांगे यांनी म्हटलं आहे.

मनोज जरांगे ४ जून रोजी सकाळी नऊ वाजता अंतरवाली सराटी येथे उपोषण सुरू करणार आहेत. ८ जून रोजी नारायण गडावर ते सभा देखील घेणार आहेत. 'सगेसोयरे'साठी पुन्हा एकदा ते उपोषण आणि आंदोलन करणार असल्याची माहिती आहे. मोदी महाराष्ट्रात इतक्या सभा घेत नव्हते पण यावेळी त्यांना मराठ्यांमुळे जिल्हा जिल्ह्यात सभा घ्याव्या लागल्या. मोदी हे गोधड्या टाकूनच महाराष्ट्रात होते. ही वेळ फडणवीस आणि त्यांच्या ४-५ लोकांमुळे आली असंही जरांगे यांनी म्हटलं आहे.

जरांगे पुढे म्हणाले, आम्ही भाजप विरोधी नाही. सगेसोयरे आणि ओबीसी मराठा एकच असल्याचा जर अध्यादेश नाही काढला तर येणारी विधानसभा निवडणूक लढवणार असंही त्यांनी म्हटलं आहे. जर सरकारने मान्य केले तर आम्ही राजकारणात पडणार नाही असंही ते पुढे म्हणालेत.

# सोलापूरात मुसळधार पावसाचा तडाखा

## जिल्ह्यात विविध ठिकाणी पाऊस

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्याच्या विविध भागात अवकाळी पावसानं थैमान घातलं आहे. अचानक आलेल्या अवकाळी पावसानं नागरिकांची चांगलीच तारंबळ होत असल्याचं पाहायला मिळत आहे.



दरम्यान, आज सोलापूर शहरासह विविध भागात मुसळधार पावसानं हजेरी लावल्याचं पाहायला मिळालं. सोलापूरह मोहोळ, माढा, करमाळा परिसरात चांगलाच अवकाळी पाऊस झाला आहे. दिवसभरात प्रचंड ऊन असताना दुपारी 4 नंतर अचानक वातावरणात बदल झाला.

### उष्णतेपासून नागरिकांना दिलासा

सोलापूर जिल्ह्यातही वादळी वारा आणि विजेच्या कडकडाटासह तुफान पाऊस झाला आहे. या पावसामुळं हवेत गारवा निर्माण झाल्यानं उकाड्यापासून नागरिकांना काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे. गेल्या काही दिवसापासून सोलापूर जिल्ह्यातील तापमानाचा पारा 40 अंशाच्या पुढे गेला होता. तसेच राज्यातील अनेक जिल्ह्यामध्ये तापमानाचा पारा हा 40 अंशाच्या पुढे गेल्याचं पाहायला मिळालं. त्यामुळं नागरिकांच्या अंगाची काहीली होत होती. अशातच आता सोलापूर जिल्ह्यात पावसानं हजेरी लावल्यानं काही प्रमाणात नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

### 19 मे पर्यंत अवकाळी पावसाचा जोर कायम राहणार

दरम्यान, हा अवकाळीचा जोर आणखी किती दिवस राहणार? असा सवाल उपस्थित केला जातोय. हवामान अभ्यासक माणिकराव खुळे यांनी दिलेल्या माहितनुसार येत्या 19 मे पर्यंत अवकाळी पावसाचा जोर कायम राहणार असल्याची शक्यता वर्तवण्यात आलीय. माणिकराव खुळे यांनी दिलेल्या माहितीनुसार राज्यात अवकाळी पावसाचे वातावरण कायम आहे. ही स्थिती 19 मे पर्यंत कायम राहील. 19 मे पासून राज्यात अवकाळी पावसाचा जोर कमी होणार असल्याची माहिती माणिकराव खुळे यांनी दिली आहे.

### फळबागांसह भाजीपाला पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान

दरम्यान, सध्या सुरु असलेल्या अवकाळी पावसामुळं अनेक ठिकाणी शेती पिकांना देखील फटका बसलाय. फळबागांसह भाजीपाला पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. त्यामुळं शेतकरी चिंतेत आहेत. अशात आता पुन्हा 19 तारखेपर्यंत अवकाळी पावसाचा इशारा दिला आहे. तसेच अनेक ठिकाणी शेतकऱ्यांच्या पॉलिहाऊसचे देखील नुकसान झाले आहे. जोराच्या वादळी वाऱ्यामुळं अनेक नागरिकांच्या घरांचं देखील नुकसान झालं आहे. दरम्यान, काल मुंबईत वादळी वाऱ्या मोठा फटका बसला आहे. अनेक ठिकाणी अपघाताच्या घटना घडल्या आहेत. वादळी वाऱ्यामुळं अनेक ठिकाणी पडझड देखील झाल्याचं पाहायला मिळालं आहे.

# स्वराज्य रक्षक छत्रपती शंभुराजे यांच्या जयंती निमित्त श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने अभिवादन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** धर्मरक्षक स्वराज्य रक्षक धर्मवीर छत्रपती शंभूराजे यांची ३६७ वी.जयंती त्या निमित्त श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज चौक येथे ट्रस्टी अध्यक्ष पद्माकर नाना काळे व उत्सव अध्यक्ष सुभाष पवार यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करून छत्रपती संभाजी महाराज यांच्या पूणार्कृती पुतळयास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.



यावेळी छत्रपती शिवाजी महाराज की जय, छत्रपती संभाजी महाराज की जय, जिजाऊ माता की जय च्या घोषणांनी छत्रपती संभाजी महाराज चौक परिसर दणाणून सोडला होता.

याप्रसंगी ट्रस्टी अध्यक्ष पद्माकर नाना काळे, ट्रस्टी कार्याध्यक्ष श्रीकांत घाडगे, ट्रस्टी उपाध्यक्ष श्रीकांत डांगे, राजन जाधव, गोवर्धन गुंड,अमोल शिंदे, रवी मोहिते, प्रताप चव्हाण, नाना भोईटे, माऊली पवार, प्रकाश ननवरे, अंबादास शेळके, उत्सव अध्यक्ष सुभाष पवार, शिवाजी वाघमोडे, अनंत जाधव उज्वल दीक्षित, वैभव गंगणे, विवेक फुटाणे, प्रकाश डांगे, सचिन गुंड, विजय पुकाळे, जीवन यादव, प्रा. संजय जाधव, ब्रह्मदेव पवार, सदाशिव पवार, मतीन बागवान, हरिभाऊ सावंत, बजरंग जाधव, राजाभाऊ आलुरे, प्रीतम परदेशी, जितू वाडेकर, अंबादास सपकाळ, गोटू पवार, विजय पोखरकर, देविदास घुले, सचिन स्वामी यांच्यासह तमाम शंभूप्रेमी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# विधानपरिषद शिक्षक, पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुका पुढे ढकलल्या

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानपरिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाची निवडणूक जाहीर करून याबाबतची मतदान प्रक्रिया 10 जून 2024 रोजी पार पडणार होती. तथापि, या निवडणुका शाळांच्या उन्हाळी सुट्ट्यांच्या कालावधीनंतर घेण्याबाबत आयोगाकडे निवेदन प्राप्त झाले. त्यानुसार भारत निवडणूक आयोगाने या मागणीचा विचार करून महाराष्ट्र विधानपरिषद शिक्षक तसेच पदवीधर मतदारसंघाच्या द्वैवाषिक निवडणुका पुढे ढकलल्या आहेत, अशी माहिती भारत निवडणूक आयोगाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. मुंबई पदवीधर मतदारसंघातून विलास विनायक पोतनीस, कोकण पदवीधर मतदारसंघातून निरंजन वसंत डावखरे, नाशिक शिक्षक मतदारसंघातून किशोर भिकाजी दराडे आणि मुंबई शिक्षक मतदारसंघातून कपिल हरिश्चंद्र पाटील हे 7 जुलै 2024 रोजी महाराष्ट्र विधानपरिषदेतून निवृत्त होत आहेत. त्यामुळे 2 शिक्षक मतदारसंघ आणि 2 पदवीधर मतदारसंघाकरिता निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला होता.

# उजनी पहिल्यांदाच मे मध्ये उणे ५० टक्के; दहा वर्षानंतरची स्थिती



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पावसाळ्यात ६४ टक्क्यांपर्यंत भरलेले उजनी धरण सध्या १४ मे रोजी मायनस (उणे) ५० टक्क्यांवर पोचले आहे. मागील १० ते १२ वर्षांत मेच्या मध्यावतधीत (१४ मे) पहिल्यांदाच धरणातील पाणीसाठा उणे ५० टक्क्यांवर गेला आहे.

सोलापूर शहरासाठी भीमा नदीतून सोडलेले पाणी २० मे रोजी औज बंधाऱ्यात पोचेल. त्यावेळी उजनी उणे ५७ ते ५८ टक्के होईल. २१ मे ते पावसाळा सुरू होईपर्यंत धरणातील उर्वरित मृतसाठा पिण्यासाठीच राखून ठेवावा लागणार आहे.

सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळ तथा दुष्काळाची तीव्रता कमी करण्यात उजनी धरणाचा निर्णायक वाटा आहे. धरणामुळे रब्बीच्या जिल्ह्यात सर्वाधिक ४० हून अधिक साखर कारखाने उभारले. फळबागा वाढल्या असून कोरडवाहू किंवा हंगामी बागायती जमिनी ओलिताखाली आल्या आहेत. उजनीच्या पाण्यावर जिल्ह्यातील दीड लाखांहून अधिक क्षेत्र भिजते.

मात्र, यंदा सप्टेंबरमध्येच दुष्काळाची चाहूल लागलेली असतानाही पाण्याचे नियोजन व्यवस्थित झाले नाही. नोव्हेंबर-डिसेंबरनंतर लगेचच जानेवारी-फेब्रुवारीत पुन्हा पाणी सोडण्यात आले. अक्षरशः (पान 2 वर..)

# मान्सूनपुर्व सर्व कामे संबधित यंत्रणांनी वेळेत पुर्ण करावीत - जिल्हाधिकारी आशीर्वाद

## मान्सून पूर्वतयारी आढावा बैठक; आपत्ती व्यवस्थापनासाठी सर्व यंत्रणांनी समन्वय ठेवावा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मान्सून काळात उद्भवणाऱ्या नैसर्गिक आपत्तीचा सामना करण्यासाठी संबधित यंत्रणांनी योग्य ती खबरदारी घेवून मान्सून पूर्व कामे वेळेच्या आत पुर्ण करावीत. तसेच मान्सून काळात येणाऱ्या पाऊस, पूर, वीज व अन्य आपत्तींचे व्यवस्थापन करण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वय ठेवावा, अशा सूचना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिल्या.



जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली मान्सूनपूर्व आढावा बैठक घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर, रो.ह.यो.उपजिल्हाधिकारी चारूशीला देशमुख,जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, जिल्हा कृषी अधिक्षक दत्तात्रय गावसाने ,आपत्ती वव्यस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदिप कारंजे, महावितरणचे कार्य.अभियंता संजय पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी संतोष नवले, जिल्हा जलसंधारण अधिकारी दयासागर दामा, मुख्य अग्निशमन अधिकारी केदार आवटे, यांच्यासह जिल्ह्यातील प्रातांधिकारी, तहसिलदार तसेच संबधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद म्हणाले, जिल्ह्यातील मोठे व मध्यम तसेच सर्वच प्रकल्पाची तातडीने दुरुस्ती करावी. पावसाळ्याच्या दिवसात संपर्क तुटणाऱ्या गावांना पुरेशा प्रमाणात औषधसाठा, धान्य पुरवठा करण्यासाठी नियोजन करावे. जिल्ह्यात संभाव्य पूरबाधित 105 गावे असून, पूर परिस्थितीमध्ये काय करावे व काय करू नये या बाबतच्या उपाययोजनांची जाणीव करून देण्याकरिता पूरग्रस्त गावातील लोकप्रतिनिधी, सेवाभावी, सामाजिक संस्था यांनी नागरिकांना प्रशिक्षण द्यावे तसेच सर्व स्तरावर जनजागृती करावी. सर्व प्रकल्पाची तातडीची दुरुस्ती करून घ्यावी. बिनतारी यंत्रणा कार्यान्वित करावी. हवामान खात्याकडून इशारे प्राप्त होताच सर्वदूर माहिती जलद गतीने पोहोचवावी. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कृती आराखडा अद्ययावत करण्यासाठी प्रत्येक विभागाने आपला आराखडा दि. 20 मेपूर्वी सादर करावा. तालुका स्तरावर नियंत्रण कक्ष सुरू करावा. पावसाळ्यात जनावरांची रोगराई नियंत्रणात ठेवण्याबाबत पशूसंवर्धन विभागाने आवश्यक उपाययोजना कराव्यात. वीज कोठे पडणार आहे याची माहिती देणारे दामिनी ॲप हवामान विभागाने तयार केले आहे. जिवितहानी टाळण्यासाठी दामिनी ॲपचा वापर करावा अधिकाऱ्यांनी या बाबत दक्षता घेवून संबधित ठिकाणी आवश्यक माहिती द्यावी. आपत्ती व्यवस्थापनाच्या अनुषंगाने निर्माण करण्यात आलेली यंत्रणा व साधने सुस्थितीत असल्याबाबत खातरजमा करून तसे प्रमाणपत्र, अहवाल सादर करावा. वारंवार आपत्तीची घटना घडणा-या ठिकाणी सूचनाफलक लावावेत अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

शहरी भागामध्ये नाले, ड्रेनेज तुंबल्याने गटारांचे पाणी बोरवेल किंवा पिण्याच्या पाण्याच्या पाईपलाईन मध्ये मिसळून साथीचे रोग निर्माण होणार नाही याची खबरदारी घ्यावी. पावसाळ्यात उत्पन्न होणाऱ्या साथीच्या रोगराईंना थांबविण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रात मुबलकपणे औषधीसाठा व इतर अनुषंगिक साहित्याची उपलब्धता ठेवावी. गावागावात बचाव पथके प्रशिक्षित करणे, होडी, यांत्रिकी बोटी, पोहणारे आदी साधनसामुग्रीची उपलब्धता तपासावी. पुरपरिस्थितीमध्ये नागरिकांना तात्पुरता निवारा, मुलभुत सोयी देण्यासाठी नगरपालिका व तहसिल विभागाने नियोजन करावे. नदीकाठावरील गावांत धोकादायक ठिकाणी (ब्लू लाईन, रेड लाईन) सीमांकन करावे, पाऊस वादळ प्रसंगी वीजपुरवठा सुरळीत राहण्यासाठी महावितरणाने पूर्व नियोजन करुन जलद सेवा पुरवावी. जिल्ह्यातील सर्व प्रकल्पाचे स्ट्रक्चर सुस्थितीत असल्याची खात्री संबंधित विभागाने करावी. तसेच शहर आणि ग्रामीण भागात अनधिकृत होर्डिंगची तपासणी करून कारवाई करुन तात्काळ धोकादायक होर्डिंग काढण्यात यावेत असे निर्देशही जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी यावेळी दिले.

यावेळी पूरस्थितीबाबत पूर्व सूचना व प्रसारण व्यवस्था, मोठे व मध्यम पाटबंधारे प्रकल्प संभाव्य पूरपरिस्थितीमध्ये बाधित होणाऱ्या गावे, पूर परिस्थितीत नदीवरील पाण्याखाली जाणारे जिल्ह्यातील सर्व पूल तसेच पाण्याचा विसर्ग याबाबत आढावा घेण्यात आला.

# 'हा काय पोरकटपणा...', नकली शिवसेना, राष्ट्रवादी म्हणणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदींना शरद पवारांचं प्रत्युत्तर, 'उद्या निवडणुकीत...'

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** पंतप्रधान नरेंद्र मोदींनी नकली शिवसेना आणि नकली राष्ट्रवादी अशी टीका केल्यानंतर शरद पवारांनी त्यांना प्रत्युत्तर दिलं आहे.





शिवसेना, राष्ट्रवादीला नकली म्हणणं हा पोरकटपणा आहे, अशा शब्दात शरद पवारांनी प्रत्युत्तर दिलं आहे. मुलाखतीत शरद पवारांनी मोदींच्या विधानावर जोरदार हल्लाबोल केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी वारंवार नकली शिवसेना आणि नकली राष्ट्रवादी असा उल्लेख करत आहेत असा प्रश्न विचारण्यात आला असता शरद पवार म्हणाले की, "पंतप्रधानांची पातळी कुठे गेली आहे हे यावरुन दिसत आहे. नकली शिवसेना म्हणण्याचं कारण काय? शिवसेनेतील एक गट शिंदेंच्या बाजूने गेला हे आपण समजू शकतो. आज मी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्या गेलो असता, अत्यंत आक्रमकपणे भूमिका मांडणारे उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वातील शिवसैनिक दिसतात. त्यांनी एक आव्हान स्विकारलं आहे. सर्व शिवसैनिक बाळासाहेबांच्या विचाराने प्रभावित होऊन समाजकारण, राजकारणासाठी उतरले आहेत. मी त्यांच्यासाठी शब्द वापरणार नाही. पण दुसरं कोणी असतं तर नकली म्हणणं म्हणजे पोरकटपणा आहे असं म्हटलं असतं".

नकली राष्ट्रवादी आहे का हे निवडणुकीतून कळेलच असा सूचक इशाराही शरद पवारांनी यावेळी दिला आहे. दरम्यान यावेळी शरद पवारांनी निवडणूक आयोगासह पंतप्रधान मोदींवर गंभीर आरोप केले आहेत. निवडणूक आयोगाला हाताशी धरुन पंतप्रधानांना सोयीचं होईल अशी निवडणूक टप्प्यांची आखणी केली गेली आहे असा गंभीर आरोप शरद पवारांनी केला आहे.

शरद पवारांच्या या आरोपावर सुधीर मुनगंटीवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले आहेत की, "निवडणुकीत जसाजसा पराभव दिसायला लागतो आणि नरेंद्र मोदी पंतप्रधान होणार नाहीत अशी ठाम भूमिका घेतल्यानंतर जेव्हा ते पंतप्रधान होणार असल्याच्या बातम्या कानावर येऊ लागल्या तेव्हा अशी कारणं मुलाखतीत दिली जातात. 1952 मध्ये पहिली निवडणूक झाली तेव्हा देशात काँग्रेसचं वातावरण होतं. ही निवडणूक 25 ऑक्टोबर ते 21 फेब्रुवारी अशी 4 महिने चालली होती. तेव्हाही अशाच प्रकारे काही लोकांनी आरोप केले असून आता त्याची रीघ ओढली जात आहे. पंडित नेहरुंच्या सोयीसाठी 4 महिने निवडणूक झाली असं सांगितलं. पण तेव्हा पंडित नेहरु आणि निवडणूक आयोगाने देशातील विविधता, आवश्यकता आणि सुरक्षेच्या दृष्टीने नीट आणि निष्पक्ष व्हावी यासाठी 4 महिने घेतल्याचं सांगितलं होतं".

## संपादकीय

# शरद पवारांचे भाकित

लोकसभा निवडणुकीनंतर देशातील बहुतेक प्रादेशिक पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होतील किंवा काँग्रेससोबत जातील, असे भाकित शरद पवार यांनी व्यक्त केल्यानंतर देशात पुन्हा एकदा विलीनीकरण या विषयावर चर्चा सुरू झाली आहे. देशात सध्या सुरू असलेल्या लोकसभा निवडणुकीची अर्धी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर शरद पवार यांनी एका इंग्रजी वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीमध्ये हे भाकित केले आहे. शरद पवार यांनी आजपर्यंत केलेली विविध वक्तव्य आणि त्याचे टाइमिंग लक्षात घेता या काँग्रेसमधील विलीनीकरणाबाबतच्या वक्तव्याचे टायमिंग आणि त्याचे महत्त्व यालाही निश्चितच काहीतरी अर्थ आहे. लोकसभा निवडणुकीनंतर विलीनीकरणाची ही प्रक्रिया सुरू होईल, असे संकेत त्यांनी दिले आहेत.

याचे दोन अर्थ निघू शकतात, एक म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजप आघाडीने पुन्हा एकदा विजय मिळवून नरेंद्र मोदी तिर्सयांदा पंतप्रधान झाले तरीसुद्धा काँग्रेसला एकत्रीकरण आणि विलीनीकरणाची मोहीम राबवावीच लागणार आहे किंवा जरी या निवडणुकीमध्ये नरेंद्र मोदी यांना सत्ता मिळाली नाही किंवा अपेक्षित यश मिळाले नाही तरीसुद्धा काँग्रेस आणि मित्र पक्षांमध्ये ही विलीनीकरण आणि एकत्रीकरणाची मोहीम वेग पकडू शकते. लोकसभा निवडणुकीनंतर मतदारांनी कोणताही कौल दिला तरी देशातील विविध प्रादेशिक पक्ष काँग्रेसच्या झेंड्याखाली एकत्र येण्याची प्रक्रिया सुरू होईल असेच शरद पवार यांना म्हणायचे आहे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील जो राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा गट आहे तो काँग्रेसमध्ये विलीन होणार का, याबाबत मात्र शरद पवार यांनी स्पष्ट काही न सांगता सहकार्यांशी चर्चा करूनच आगामी कालावधीमध्ये आम्ही निर्णय घेणार आहोत पण काँग्रेस आणि आमची विचारधारा एकच आहे, असे सुचवले आहे. एवढेच नव्हे तर शिवसेनेच्या उद्धव ठाकरे गटाची विचारधारासुद्धा आम्हाला मान्य होण्यासारखी आहे, असेही त्यांनी मुलाखतीत म्हटले आहे. या सर्व मुलाखतीमधील आणखी एक महत्त्वाचा भाग हा आहे की राजकारणातील नवीन पिढीला कोणत्याही परिस्थितीत सत्तेच्या दिशेने आणि सत्तेच्या बाजूने जायचे आहे. साहजिकच काँग्रेसच्या विचारधारेसाठी अशा प्रकारचे विलीनीकरण किंवा एकत्रीकरण गरजेचे आहे, असे शरद पवार यांनी म्हटले आहे.

देशातील सर्वात जुना राजकीय पक्ष असलेल्या काँग्रेसचे गेल्या 130 ते 135 वर्षांच्या कालावधीमध्ये अनेक वेळा विघटन होऊन प्रादेशिक पातळीवर किंवा राष्ट्रीय पातळीवर काँग्रेसचे अनेक नवीन गट तयार झाले. काळाच्या ओघात त्यापैकी अनेक गट किंवा पक्ष पुन्हा काँग्रेसला जाऊन मिळाले असले तरी राज्याराज्यांमध्ये काँग्रेसची विचारधारा मानणारे पण वेगळा सवता सुभा करणारे अनेक राजकीय पक्ष आजही अस्तित्वात आहेत. शरद पवारांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हे त्याचे ठळक उदाहरण आहे. या व्यतिरिक्त पशचिम बंगालमधील तृणमूल काँग्रेस असो किंवा हरियाणा आणि पंजाबमधील काँग्रेसचे काही गट असोत किंवा ईशान्य भारतामध्येसुद्धा स्थानिक पातळीवर स्थापन झालेले काँग्रेसी विचारधारा मानणारे काही पक्ष असोत असे अनेक पक्ष आपला मूळचा काँग्रेसचा डीएनए जपून ठेवून काम करत आहेत. पण आज काही राज्यांमध्ये काँग्रेसमधून बाहेर पडलेले प्रादेशिक पक्ष एवढे मोठे झाले आहेत की ते पुन्हा मूळ पक्षामध्ये सामील होतील अशी कोणतीही शक्यता नाही. पश्चिम बंगालमधील ममता बॅनर्जी यांचे तृणमूल काँग्रेस हे त्याचे सर्वात मोठे उदाहरण आहे. तसेच जे काँग्रेसपासून बाजूला गेले आणि नंतर त्याही पक्षाचे विविध तुकडे होऊन जे विविध राजकीय पक्ष राज्याराज्यांत अस्तित्वात आहेत त्यांचीही काँग्रेसमध्ये विलीन होण्याची शक्यता खूप कमी असली, तरी काँग्रेससोबत एकत्र राहण्याची शक्यता जास्त आहे. उत्तर प्रदेशमधील समाजवादी पक्ष असो किंवा बिहारमधील लालूप्रसाद यांचा राष्ट्रीय जनता दल असो किंवा दक्षिण भारतातील द्रमुकसारखे पक्ष असो अनेक पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होण्याची शक्यता खूपच कमी आहे. पण हे पक्ष काँग्रेसच्या झेंड्याखाली मात्र निश्चितच एकत्र येऊ शकतात आणि शरद पवार यांना या मुलाखतीद्वारे हेच सुचवायचे आहे.

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनीसुद्धा गेल्या आठवड्यामध्ये अशाच आशयाचे विधान केले होते. विद्यमान राजकारणाचा विचार करता सध्या काँग्रेस राष्ट्रीय पक्ष असला तरी अनेक प्रादेशिक मित्र पक्षांच्या तुलनेत त्यांची बाजू थोडी कमकुवत आहे. सध्याच्या लोकसभा निवडणुकीमध्ये पंतप्रधानपदाचा उमेदवार म्हणून काँग्रेसच्या कोणत्याही नेत्याचे नाव अद्याप या आघाडीने जाहीर केलेले नाही, पण शरद पवार किंवा पृथ्वीराज चव्हाण यांनी म्हटल्याप्रमाणे लोकसभा निवडणुकीनंतर असे अनेक छोटे मोठे प्रादेशिक पक्ष काँग्रेसमध्ये विलीन झाले किंवा काँग्रेसच्या झेंड्याखाली एकत्र आले तर काँग्रेसची ताकद जास्तच वाढणार आहे. सोनिया गांधी यांच्या नेतृत्वाखाली जेव्हा संयुक्त पुरोगामी आघाडीची स्थापना झाली होती तेव्हा त्या आघाडीमध्ये काँग्रेसचा वरचष्मा होता आणि इतर घटक पक्षांना त्यामानाने कमी महत्त्व होते. गेल्या काही वर्षांच्या कालावधीमध्ये भाजप ज्या प्रकारचे प्रभावशाली राजकारण करत आहे त्याला सडेतोड उत्तर द्यायचे असेल तर काँग्रेससारख्या एखाद्या राष्ट्रीय पक्षाच्या नेतृत्वाखालीच ते उत्तर देणे शक्य होणार आहे याची जाणीव पुन्हा एकदा करून देण्याचे काम शरद पवार यांनी आणि काही दिवसांपूर्वी पृथ्वीराज चव्हाण यांनी करून दिली आहे. लोकसभा निवडणुकीचे निकाल हाती आल्यानंतर जर त्यामध्ये इंडिया आघाडीला यश मिळाल्याचे लक्षात आले तर या प्रयोगाला आणखी वेग येण्याची शक्यता आहे. शरद पवार यांच्यासारखा ज्येष्ठ नेता जेव्हा ऐन निवडणुकीच्या कालावधीमध्ये एखादे विधान करतो तेव्हा त्याला निश्चितच खूप महत्त्व असते हे सुद्धा या ठिकाणी विसरून चालणार नाही म्हणूनच त्यांचे हे भाकित सर्वांनीच विचार करावा असे आहे.

# उन्हाळी शिबिरांची उपयुक्तता किती असते?

वार्षिक परीक्षा संपून सुट्ट्या सुरू झाल्या की जिकडे तिकडे उन्हाळी शिबिरांची रेलचेल सुरू होते. प्रत्येक ठिकाणी गायन, वादन, नाट्य, अभिनय, नृत्य, साहसी खेळ जसे ट्रेकिंग, स्विमिंग अशा विविध विषयांशी निगडित शिबिरांचे आयोजन केले जाते. पालक ही आपल्या मुलांना परीक्षा संपल्या की उन्हाळी शिबिरात दाखल करतात. खरंतर उन्हाळी सुट्टीत मुलांनी मस्त मजा करावी, मित्र मैत्रिणींसोबत मनसोक्त खेळावे, बागडावे, मैदानी खेळ खेळावेत, आवडीची पुस्तके वाचावीत, मामाच्या गावाला किंवा खेडेगावात जाऊन निसर्ग अनुभवावा, गड किल्यांची भटकंती करावी. मुलांनी त्यांची सुट्टी एन्जॉय करावी. पण असे करण्याऐवजी पालक आपल्या मुलांना उन्हाळी शिबीराच्या दावणीला बांधतात. मुलांचा कल, मुलांची आवड न पाहता पालक आपल्या मुलांना उन्हाळी दाखल करतात. वाढत्या स्पर्धेच्या युगात आपला मुलगा अभ्यासासोबतच इतर कलागुणांमध्येही मागे राहू नये म्हणून पालक आपल्या मुलांना उन्हाळी शिबिरात दाखल करतात पण ही उन्हाळी शिबिरं आपल्या मुलांसाठी किती उपयुक्त आहेत या उन्हाळी शिबिरांचा मुलांना खरंच उपयोग होतो का? याचा विचार मात्र पालक करीत नाहीत. उन्हाळी शिबिरातील मुलांच्या सुरक्षेबाबत आयोजक गंभीर आहेत का याचाही विचार पालकांनी करावा कारण तीन वर्षांपूर्वी म्हणजे कोरोनाच्या आधी पुण्यात एका शिबिरात मुळशी धरणात पोहायला गेलेल्या तीन मुलांचा बुडून मृत्यू झाला होता. या घटनेमुळे उन्हाळी शिबिरातील मुलांच्या सुरक्षेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. पालकांनीही आपल्या मुलांना उन्हाळी शिबिरात दाखल करण्यापूर्वी शिबिरातील सुरक्षा व्यवस्थेची खात्री केली पाहिजे. या शिबिरांना शासनाची मान्यता आहे का याचीही खात्री करायला हवी. सरकारनेही आयोजकांची क्षमता व सुरक्षा व्यवस्थेची पाहणी करूनच अशा शिबिरांना मान्यता द्यायला हवी. शिबिरादरम्यान जर काही दुर्घटना घडली तर त्या दुर्घटनेस आयोजकांनाच जबाबदार धरले पाहिजे. काही शिबिरांना मिळणारा प्रतिसाद उत्स्फूर्त असतो तर काहींना अल्प प्रतिसाद मिळतो अर्थात या शिबिरातून सर्वच गोष्टी शिकायला मिळतात असे नाही. याउलट वर्षभर चालणाऱ्या विविध शिबिरातून मुलांना अनेक गोष्टी शिकायला मिळतात असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. सुट्टीच्या दिवसातील शिबिरांना बऱ्यापैकी पैसे मोजावे लागतात. टीव्ही, मोबाईल, व्हिडीओ गेममध्ये डोके खुपसून बसण्यापेक्षा पैसे जात असले तरी मुले गुंतून राहत असल्यामुळे पालक हाही खर्च सहन करतात. पालकांचा हेतू उदात्त आहे मात्र पालकांनी मुलांच्या आवडीनिवडी जपाव्यात. आपल्याला हवे तसे नको तर मुलांना हवे ते देण्याचा, शिकवण्याचा प्रयत्न करावा. एकूणच या शिबिरांची आपल्या मुलांना कितपत गरज आहे याचा विचार करूनच पालकांनी आपल्या मुलांना उन्हाळी शिबिरात दाखल करावे.



**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

पान १ वरून

## उजनी पहिल्यांदाच मे मध्ये उणे...

शेतकऱ्यांनी पाणी बंद करा म्हणून निवेदने दिली, काहींनी आंदोलनांचा इशाराही दिला होता. दुसरीकडे सोलापूर शहराच्या जुनाट पाइपलाइनवरून नागरिकांची तहान भागत नसल्याने तीनवेळा औज बंधाऱ्यात पाणी सोडावे लागले. दीड-दोन टीएमसीची साठवण क्षमता असलेल्या या बंधाऱ्यापर्यंत पाणी पोचण्यासाठी धरणातून पाच ते साडेपाच टीएमसी पाणी सोडावे लागते. आता धरण रिकामे झाले असून पावसाळा लांबल्यास जिल्ह्यातील टंचाई अधिकच तीव्र होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सर्वांनी जपून पाणी वापरावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

**२०१८-१९ मध्येही धरण उणे ५९ टक्के**

पाच वर्षांपूर्वी जिल्ह्यात अशीच दुष्काळजन्य स्थिती उद्‌भवली होती. पाऊस देखील लांबणीवर पडला होता आणि सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला होता. त्यामुळे २०१८-१९ मध्ये पुढच्या वर्षीचा पावसाळा सुरू होईपर्यंत धरण उणे ५९ टक्के झाले होते. मात्र, यंदा धरणातील पाणीसाठा उणे ६५ टक्क्यांहून अधिक खोलवर जाईल, अशी सद्य:स्थिती आहे.

**पिराची कुरोलीतून पाणी पुढे**

उजनी धरणातून सध्या सोलापूर शहरासाठी पाणी सोडण्यात आले आहे. सहा हजार क्युसेकचा विसर्ग भीमा नदीत सोडण्यात आला असून पिराचीकुरोली येथून पाणी पुढे औज बंधाऱ्याच्या दिशेने जात आहे. नदी पात्रातील बंधारे दोन मीटरने चढविले असून पाणी बंद केले तरी नदीतील सर्व बंधाऱ्याच्या ठिकाणी दोन मीटरपर्यंत पाणी राहणार आहे. जेणेकरून तेथून होणारा पाणीपुरवठा खंडित होणार नाही, याची खबरदारी घेण्यात आली आहे.

# अक्कलकोट येथे छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सव सोहळा समितीचे आधारस्तंभ अमोलराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थापक अध्यक्ष अतिश पवार यांच्या वतीने राजा शिवछत्रपती शिवाजी महाराज चौक,एस-टी स्टँड येथे छत्रपती संभाजी महाराज यांच्या मूर्तीस आधारस्तंभ नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण,पुजन करुन मोठ्या उत्साहात जयंती साजरी करण्यात आली.



यावेळी उपनगराध्यक्ष यशवंत तात्या धोंगडे, अल्पसंख्याक सोलापूर जिल्हाध्यक्ष-नन्नू( भाई) कोरबू, भा.ज.पा.तालुका अध्यक्ष मोतीराम राठोड, आर.पी.आय तालुकाध्यक्ष- अविनाशजी मडीखांबे, भा.ज.पा.शहर अध्यक्ष-शिवशरण जोजन, मराठा समाजाचे नेते-मनोज निकम, नगरसेवक विनोद मोरे, राजा छत्रपती शिवाजी महाराज चौक संस्थापक अध्यक्ष तम्मा (मामा) शेळके, अतुल जाधव, इंजि. वरुण शेळके, सुहास सुरवसे, वडार समाज तालुका अध्यक्ष अंकुश चौगुले, प्रहार संघटना अध्यक्ष अमर सिरसाट, ऋषिकेश लोणारी, राजाभाऊ नवले, शितल फुटाणे, अभिषेक लोकापुरे, केदार माळशेट्टी, सिध्दु माळी, देविदास गवंडी, प्रथमेश पवार, राहुल वाडे, हुसेन बळोरगी, शरद भोसले, प्रसाद मोरे, प्रसन्न गवंडी, आकाश सुर्यवंशी, अनंत क्षीरसागर, अमोल सुरवसे, विकास पवार, निशांत निंबाळकर, संतोष श्रीमान साहेब, अजय शिंदे, समर्थ शिंदे, दिनेश पाटील, उत्सव अध्यक्ष-आनंद (छोटू) पवार, उपाध्यक्ष-शेखर वाले, गणेश पाटील, सचिव- वैभव मोरे, आबा सूर्यवंशी, शुभम धुमाळ, सहसचिव-अमित कोळी, बसवराज भोळे, कार्याध्यक्ष-भरत राजेगांवकर, रवि पोळ,ओंकार जाधव, उपकार्यध्यक्ष- सचिन बिराजदार, आकाश चौगुले, उत्सव खजिनदार - लक्ष्मण शिंदे, राजाराम पवार, पुजा प्रमुख- शरणू किणीकर, निखील शिंदे, शशांक सुरवसे, प्रज्वल पोतदार, प्रसाद चव्हाण, अंबादास शिंदे, संकेत बिराजदार, किशोर ढंगे, स्टेज प्रमुख- सिध्दु लव्हारे, प्रशांत बंदिछोडे, श्रीशैल हळीमनी, समर्थ कलशेट्टी, युवराज तानवडे, प्रसिद्धी प्रमुखः- अभिषेक चव्हाण, दत्ता मोरे, समर्थ नडगिरे, ओंकार दुरगकर, रुषी चव्हाण, गणेश पवार, अजय वांजरे, विष्णू गुंठे, सोमनाथ शिंदे, शिवशंभूभक्त यांच्यासह मित्र परिवार उपस्थित होते.

# पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी घेतला जिल्ह्यातील टंचाई परिस्थितीचा आढावा

**सांगली :** टंचाई परिस्थिती उद्भवलेल्या भागातील जनतेला पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यास प्राधान्य द्यावे, अशा सूचना पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी जिल्ह्यातील टंचाई परिस्थिती आढावा बैठकीत दिल्या.

पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात जिल्ह्यातील टंचाई परिस्थिती संदर्भात आढावा बैठक झाली. बैठकीस जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी, मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे, महापालिका आयुक्त शुभम गुप्ता, अपर जिल्हाधिकारी डॉ. स्वाती देशमुख, नगर प्रशासन विभागाच्या सह आयुक्त पूनम मेहता, उपयुक्त समीक्षा चंद्राकर, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती पाटील यांच्यासह जिल्हास्तरीय यंत्रणांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

पुणे विभागीय आयुक्त डॉ. पुलकुंडवार यांनी सांगितले, जलसंपदा विभागाने धरणातील पाणीसाठा व उपसा सिंचन योजना मधील पाण्याचे योग्य नियोजन करावे. जिल्ह्यातील दुष्काळी भागातील लोकांना पुरेसे पाणी मिळावे म्हणून उपलब्ध पाण्याचे स्त्रोत निश्चित करावेत.

जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी सादरीकरणाद्वरे जिल्ह्यातील टंचाई परिस्थिती माहिती दिली. जिल्ह्यात सद्यस्थितीत ९८ टँकर सुरू असून यामध्ये जत तालुक्यात 86, आटपाडी 11 आणि एक टँकर शिराळा तालुक्यात सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. शासन निकषानुसार दुष्काळ परिस्थिती जाहीर झालेल्या तालुक्यांमध्ये दुष्काळाच्या आठ उपाय योजना लागू करण्यात आल्याची माहिती देवून जिल्ह्यात सद्यस्थितीत आवश्यक चारा उपलब्ध असल्याचेही त्यांनी सांगितले.



**माझी वसुंधरा अभियानाचा विभागीय आयुक्तांकडून आढावा**

**जिल्ह्यात स्वच्छतेची मोहिम प्रभावीपणे राबवा : पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार**

गावे व शहरे स्वच्छ व्हावीत, लोकांना स्वच्छतेची सवय जडावी, नागरिकांनी स्वच्छतेची जीवन पध्दती अंगीकारावी यासाठी जिल्ह्यात स्वच्छतेची मोहिम प्रभावीपणे राबवावी, अशा सूचना पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी आज दिल्या.

जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित बैठकीत पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी माझी वसुंधरा अभियानातील कामांचा आढावा घेतला. बैठकीस जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी, मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे, महापालिका आयुक्त शुभम गुप्ता, अपर जिल्हाधिकारी डॉ. स्वाती देशमुख, नगर प्रशासन विभागाच्या सह आयुक्त पूनम मेहता, उपयुक्त समीक्षा चंद्राकर, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती पाटील यांच्यासह जिल्हास्तरीय यंत्रणांचे प्रमुख अधिकारी, गटविकास अधिकारी व नगरपालिकांचे मुख्याधिकारी उपस्थित होते.

डॉ. पुलकुंडवार म्हणाले, नागरिकांना स्वच्छतेची सवय लागणे महत्वाचे आहे. स्वच्छतेमुळे पर्यावरण रक्षण व संवर्धन होते. माझी वसुंधरा अभियानात भूमि, जल, वायू, अग्नी आणि आकाश या पाच घटकांच्या माध्यमातून स्वच्छतेचे काम होत आहे. यामध्ये महापालिका, नगरपालिका, नगरपंचायती आणि ग्रामपंचायतींनी सक्रीय सहभाग घेवून आपला भाग स्वच्छ ठेवण्यासाठी पुढाकार घ्यावा. स्वच्छतेचा संदेश घरोघरी पोहोचविण्यासाठी शालेय विद्यार्थी महत्वाची भूमिका बजावतो. या विद्यार्थ्यांच्या माध्यमातून घराघरात स्वच्छतेचा संदेश पोहचवावा. स्वच्छतेसाठी ग्रामस्तरापर्यंत मजबूत टीम असावी. तहसिलदार, गटविकास अधिकाऱ्यांनी स्वच्छतेसंदर्भात नियमित बैठका घ्याव्यात. जिल्हास्तरावरून त्यांना योग्य ते मार्गदर्शन व मदत केली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे, महापालिका आयुक्त शुभम गुप्ता, जिल्हा प्रशासन अधिकारी ज्ञानेश्वर ढेरे यांनी जिल्ह्यात त्यांच्या विभागामार्फत माझी वसुंधरा अभियानात सुरू असलेल्या उपक्रमांची माहिती दिली.

# बाळराजे पाटील यांच्या अभीष्टचिंतन सोहळ्यानिमित्त युवा प्रबोधनकार वसंत हंकारे प्रबोधन

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** वृद्धाश्रमामध्ये गेलो. पंच्चाहत्तरीची आजी डोळ्यांमध्ये आसवं आणून बसली होती. बघवलं नाही म्हणून खिशामध्ये हात घातला. पाचशे रुपयांची नोट हाताला लागली. आजीच्या हातात ठेवली. आजीला म्हटलं, 'आजी काही पाहिजे असेल ते घे. हे संपल्यानंतर तुझा मुलगा तुला अजून पाचशे रुपये देण्यासाठी येईल'. 'नको पाचशे रुपये मला, माझं एक काम करशील का? मला माझा मुलगा येतो म्हणून गेला आहे तो अजून आला नाही. त्याची आणि माझी भेट घालून दे कितीही चुकला तर आईबापासमोर नतमस्तक होऊन बघ नक्की माफ करतील.' 'आईबाप समजून घेताना' या विषयावर युवा प्रबोधनकार वसंत हंकारे प्रबोधनप्रसंगी बोलताना सांगितले. लोकनेते कारखान्याचे चेअरमन बाळराजे पाटील यांच्या अभीष्टचिंतन सोहळ्यानिमित्त युवा प्रबोधनकार वसंत हंकारे प्रबोधन प्रसंगी बोलत होते. व्याख्यानाचा विषय आईबाप समजून घेताना. कार्यक्रमप्रसंगी प्रियंका पाटील, प्राजक्ता पाटील, डॉ. विनिता गोरे, डॉ. विशाखा फाळके-पाटील, सिनेट सदस्य अजिंक्यराणा पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. हंकारे पुढे म्हणाले, रक्ताचे पाणी करून ज्या आईबापाने संभाळलं, शिकवलं त्यांचा जिवंत असेपर्यंतच संभाळ करा. मेल्यानंतर त्याच्यापर्यंत काहीच पोहोचत नाही.



# खरीप पेरा ३० हजार हेक्टरने वाढण्याची शक्यता

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यात आगामी खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर कृषी विभागाची तयारी पूर्ण झाली असून, जिल्ह्याचे खरिपाचे सरासरी क्षेत्र २ लाख ८९ हजार ५७० हेक्टर इतके आहे. पण गतवर्षी ३ लाख ४६ हजार २१५ हेक्टरवर पेरणी झाली होती, यंदा पाऊस चांगला पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे खरिपाच्या क्षेत्रात आणखी किमान ३० हजार हेक्टरने वाढ होण्याची शक्यता आहे.

सोलापूर जिल्हा रब्बीचा म्हणून गणला जातो, पण अलीकडच्या काही वर्षात खरिपातही पिके होत आहेत. गेल्या अनेक वर्षात खरिपातील बाजरी, भुईमूग आदी पिकांचे क्षेत्र कमी झाले आहे. तर त्या ऐवजी सोयाबीन, तूर, उडीद, मका या पिकांचे क्षेत्र वाढले आहे. या पिकामुळे पेरणी क्षेत्रातही वाढ झाली आहे.

यंदा चांगल्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आल्याने किमान ३० हजार ५०८ हेक्टरने वाढ होईल, असा अंदाज आहे, हे गृहीत धरून कृषी विभागाने नियोजन केले आहे. प्रामुख्यानो सोयाबीन, तूर या पिकांच्या क्षेत्रात वाढ होईल, यंदा सोयाबीनच्या दरात फारशी वाढ झालेली नाही, पण तुरीचे दर प्रतिक्विंटलला उच्चांकी दहा हजार रुपयांच्या घरात पोहोचले आहेत. त्यामुळे त्याकडे शेतकऱ्यांचा कल असेल, जिल्ह्यातील अक्कलकोट, बार्शी, मोहोळ, मंगळवेढा, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर या तालुक्यात सर्वाधिक पेरा होईल, अशीही शक्यता आहे.



**घरचे सोयाबीन वापरण्यासाठी मोहीम**

गेल्यावर्षी जिल्ह्यात १ लाख ३३ हजार २११ हेक्टरवर सोयाबीनची पेरणी झाली होती. यंदा १ लाख ३५ हजार हेक्टरवर ती पोचण्याचा अंदाज आहे. तीन वर्षांपूर्वी २०२१ मध्ये ११ हजार ५०१ क्विंटल सोयाबीन बियाण्यांची जिल्ह्यात विक्री झाली होती. ती आता १५ हजार ४६० क्विंटलपर्यंत वाढली आहे. यावरून सोयाबीनच्या क्षेत्रात सातत्याने वाढ होत असल्याचे दिसते.

# वाहनांची तोडफोड करताना रोखले; बार्शीत दोघा माथेफिरूंचा खुनीहल्ला

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** भल्या सकाळी हातात कोयता आणि लोखंडी पाईप घेऊन वाहनांची मोडतोड करताना हस्तक्षेप केल्यामुळे दोघा माथेफिरू तरुणांनी एका व्यावसायिकावर कोयत्याने प्राणघातक हल्ला केला. बार्शी शहरातील लहुजी नगरात हा प्रकार घडला. सतीश अशोक हणुमंते (वय ४३,रा. लहुजीनगर, बार्शी) असे या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या व्यावसायिकाचे नाव आहे. त्यांनी दिलेल्या फियार्दीनुसार गणेश नंदू शिंदे (वय २५) आणि नारायण मच्छिंद्र लोखंडे (वय २६) या दोघाना पोलिसांनी अटक करून त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.



जखमी सतीश हणुमंते यांचे बार्शीत लहुजी नगरात राजलक्ष्मी वॉशिंग सेंटर नावाने दुचाकी, चार चाकी वाहने धुण्याचा व्यवसाय आहे. सकाळी साडेसहाच्या सुमारास हणुमंते हे आपल्या दुकानाजवळ थांबले होते. त्यावेळी त्यांच्याच गल्लीत राहणारे गणेश शिंदे व नारायण लोखंडे हे दोघे हातात कोयता आणि लोखंडी पाईप घेऊन आसपासची दिसेल त्या वाहनांची तोडफोड करीत येत होते. तेव्हा हणुमंते हे त्या दोघांना रोखण्यासाठी पुढे सारसावले. परंतु त्यापैकी गणेश शिंदे याने हणुमंते यांना, तू मध्ये का आलास, असे विचारून त्यांच्यावर कोयत्याने हल्ला केला. गळ्यावर कोयत्याचा तीक्ष्ण वार झाल्यामुळे हाणुमंते हे गंभीर जखमी होऊन रक्तच्या थारोळ्यात कोसळले. त्यावेळी नारायण लोखंडे हा हातात लोखंडी पाईप घेऊन हवेत फिरवत, आरडाओरड करीत दहशत निर्माण करीत होता, असे फियार्दीत म्हटले आहे.

## वात्रटिका

### उतावीळ खासदार

अवकाळी बरोबर वादळ
लोकांचा जीव घेऊ लागले...
मतदान झाले की नेतेही
उतावीळ होऊ लागले...
होर्डिंग्जने जीव घेतला
तरी तसे झळकू लागले...
निकालाआधीच विजयाची
अक्कल पाजळू लागले...

**हणमंत पडवळ,**
उस्मानाबाद,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडुरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# दूध व्यवसाय करण्यासाठी सरकार देणार 75 टक्के अनुदान



**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** सरकार हे शेतकऱ्यांसाठी नेहमी नवनवीन योजना आणत असतात शेतीशी निगडित व्यवसाय त्याचप्रमाणे शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी आणि शेतकऱ्यांची आर्थिक मदत व्हावी या कल्पनेतून सरकारने अनेक योजना राबवलेल्या आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना अनुदानाच्या स्वरूपात आर्थिक मदत मिळते.

शेतकरी शेतीसोबत अनेक जोड व्यवसाय करत असतात. या सगळ्यात पशुसंवर्धन हा व्यवसाय प्रामुख्याने अनेक गावांमध्ये केला जातो. या व्यवसायाला शेतीच्या आणि दूध उत्पादनाच्या दृष्टीने खूप महत्त्व आहे. त्यामुळे आता कृषी संवर्धन या व्यवसायाला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य सरकारच्या जिल्हा परिषद आणि राज्यस्तरीय पशुवर्धन विभागाच्या माध्यमातून योजना राबवण्यात येतात. आणि त्या माध्यमातून शेतकऱ्यांना अनुदान देखील मिळते. या योजनेच्या माध्यमातून सुशिक्षित तरुण आणि शेतकऱ्यांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी खूप मदत होते. या योजनेअंतर्गत अनुसूचित जाती, जमाती प्रवर्गाला 75 टक्के आणि सर्वसाधारण प्रवर्गांना 50% इतके अनुदान दिले जाते.

**दुधाळ जनावरांवर मिळणार अनुदान**

राज्य सरकारने जिल्हा परिषदेचे पशुसंवर्धन विभागाच्या माध्यमातून या योजनेअंतर्गत अनुदानावर दुधाळ जनावरांना वाटप करण्यात येते. आणि या माध्यमातून अनुसूचित जाती जमाती प्रवर्गाला 75 टक्के व सर्वसाधारण गटाला 50 टक्के अनुदानाचा लाभ मिळतो. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना दोन दुधाळ जनावरांचा एक गट वाटप करण्यात येतो. गाईच्या गटासाठी 75 टक्के म्हणजे 1 लाख 67 हजार 668 रुपये अनुदान दिले जाते. तर म्हशीच्या एका गटासाठी 1 लाख 34 हजार 443 रुपये एवढे अनुदान दिले जाते.

**योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्रता**

या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी अनुसूचित जाती किंवा जमातीतील असणे गरजेचे आहे. लाभार्थी हा दारिद्र रेषेखाली असेल तर त्याला प्राधान्य दिले जाते. अल्पभूधारक शेतकरी सुशिक्षित बेरोजगार तरुणांना देखील या योजनेचा लाभ होतो.

**ऑनलाइन अर्ज कसा करायचा?**

या योजनेचा तुम्हाला लाभ घ्यायचा असेल, तर तुम्हाला ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावा लागेल. यासाठी तुम्हाला महाबीएमएस या संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावा लागेल. त्यानंतर पात्र उमेदवारांना दुधाळ जनावरांचा गट वाटप करण्यात येईल.

## संगमेश्वर पब्लिक स्कूलमधून जोया व ओम अव्वलस्थानी

# इयत्ता दहावी सीबीएसईचा निकाल शंभर टक्के



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** केंद्रीय माध्यमिक शिक्षण बोडार्चा दहावीचा निकाल जाहीर झाला असून 13 मे रोजी दुपारी 1 वाजता सीबीएसई बोर्डाने दहावीचा निकाल https://cbseresults.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिला आहे. फेब्रुवारी 2024 मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावी सीबीएसई बोर्ड परीक्षेचा संगमेश्वर पब्लिक स्कूलचा निकाल शंभर टक्के लागला असून जोया जमादार व ओम स्वामी हे अव्वलस्थानी राहिले. यावर्षी एकूण 46 विद्यार्थी परीक्षेला बसले होते त्यापैकी पाच विद्यार्थी 90% पेक्षा जास्त गुण घेऊन उत्तीर्ण झाले तर 22 विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य प्राप्त केले.

निकाल – प्रथम क्रमांक– जोया जमादार – 93.2%, द्वितीय क्रमांक – ओम स्वामी – 92.4%, तृतीय क्रमांक – आर्यन सुरवसे– 90.4%. विषयात प्रथम आलेले विद्यार्थी –मराठी विषयात प्रियरंजन मस्के या विद्यार्थ्याने 100 पैकी 100 गुण मिळविले तर सागर शेटे या विद्यार्थ्याने 100 पैकी 99 गुण मिळविले. ओम स्वामी इंग्रजी 93 गुण, गणित 97 गुण, विज्ञान 96 गुण, जोया जमादार हिंदी 96 गुण, समाजशास्त्र 94 गुण, निहाल पटेल कंप्यूटर ९६ गुण.

यशस्वी गुणवंतांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी संगमेश्वर पब्लिक स्कूलचे चेअरमन धर्मराज काडादी यांनी विद्यार्थी –पालकांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी शालेय समिती सदस्य संतोष पाटील, संगमेश्वर पब्लिक स्कूलच्या प्राचार्या प्रियंका समुद्रे, प्री प्रायमरी प्रमुख कीर्ती शंकू यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

यंदाच्या वर्षी फेब्रुवारी ते एप्रिल या दरम्यान सीबीएसई बोर्डाच्या परीक्षांचं आयोजन करण्यात आलं होतं. सीबीएसई बोर्डाची दहावीची परीक्षा लवकर संपली होती. सीबीएसई दहावीची परीक्षा 15 फेब्रुवारी ते 13 मार्चपर्यंत सुरू होती. यंदाच्या वर्षी सीबीएसई परीक्षेत 39 लाख विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती.

सीबीएसई दहावीच्या परीक्षेत एकूण 93.6 टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. तर मुलींचा निकाल मुलांहून चांगला आला आहे. यंदाच्या वर्षी 94.75 टक्के मुली उत्तीर्ण झाल्या आहेत. बोर्डाने सीबीएसई बारावीच्या घोषणेनंतर दहावीचा निकाल जाहीर केला. सीबीएसई बारावीत 87.98 टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

# देगाव मध्ये दुचाकींचा भीषण अपघात एक ठार एक जखमी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यात अलीकडे अपघाताचं प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढलं असून दररोज अपघाताच्या अनेक बातम्या समोर येत असतात. याचदरम्यान सोलापूर जिल्ह्यात दोन दुचाकींच्या अपघातात एकाचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. सोलापूर शहरापासून 06 किमी अंतरावर असलेल्या सोलापूर – मंगळवेढा महामार्गावर दोन दुचाकींचा अपघात झाला आहे. या अपघातामध्ये एकजण जागीच ठार झाला असून दुसरा व्यक्ती गंभीर जखमी झाला आहे. मृत युवकाचे अभिषेक केनगाडे तर सुदर्शन काळे असे जखमी युवकाचे नाव आहे. सोलापूर जवळ असलेल्या देगाव जवळ ही घटना घडली आहे. पोलिसांनी घटनास्थळी जात अपघाताचा पंचनामा केला आहे. वेगात असलेली दुचाकी दुभाजकला धडकून अपघात झाल्याची प्राथमिक माहिती आहे. जखमी युवकाला तात्काळ सोलापूर शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान, वाहन चालकांसाठी अनेक वाहतूक नियम असताना अनेक ठिकाणी त्याचं पालन न झाल्याने अपघाताच्या संख्येमध्ये वाढ होताना पाहायला मिळत आहे. वाहतूक विभागकडून सातत्याने चालकांसाठी असलेल्या नियमानसंदर्भात जनजागृती करण्याचा प्रयत्न केला जातो. मात्र, अनेक ठिकाणी नियम धाब्यावर बसवून वाहन चालवली जात असल्याने नाहक अपघात होत आहेत. अकोला, नाशिक, सोलापूर या जिल्ह्यातील अपघाताच्या घटना ताज्या असताना, आता या घटनेची देखील भर पडली आहे. वाहतूक अपघात नियंत्रणासाठी असलेल्या नियमांची प्रभावी अंमलबजावणी होण्याची नितांत गरज आहे. यासाठी वाहतूक विभाग कडक धोरणात्मक भूमिका घेणार का? हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे.

# विद्यापीठाकडून विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल लागण्यास सुरुवात



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाकडून एम. एड अंतिम वषार्चा निकाल अवघ्या वीस दिवसात जाहीर झाला आहे. परीक्षा पूर्ण झालेल्या विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल लागण्यास सुरुवात झाल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. श्रीकांत अंधारे यांनी दिली.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाकडून सुरुवातीला पदवी पारंपरिक अभ्यासक्रमांच्या परीक्षा घेण्यात आल्या. पदवी अभ्यासक्रमांच्या परीक्षा पूर्ण झाल्या आहेत. पूर्ण झालेल्या परीक्षांचे निकाल जाहीर होत आहेत. सोमवारी एमएड अंतिम वर्षाच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला. इतर अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यासाठी परीक्षा विभागातील अधिकारी व कर्मचारी परिश्रम घेत आहेत. वेळेत निकाल जाहीर करण्यासाठी परीक्षा विभागाची टीम कामाला लागली आहे.

सध्या पदव्युत्तर पदवी, एमबीए आणि अभियांत्रिकीच्या विविध विद्याशाखांच्या परीक्षा सुरू आहेत. काही अभ्यासक्रमांच्या परीक्षा मे मध्ये तर काही अभ्यासक्रमांच्या परीक्षा जून महिन्यात पूर्ण होणार आहेत. परीक्षा झालेल्या अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यासाठी विद्यापीठ प्रशासन प्रयत्नशील आहे. कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर आणि प्र कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा यांच्या मार्गदर्शनाखाली विविध अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर होत आहेत असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. श्रीकांत अंधारे यांनी सांगितले.




संभाजी ब्रिगेड आयोजित छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सव मध्यवर्ती मंडळ कोंडी च्या वतीने छत्रपती संभाजी महाराज यांच्या 367 व्या जयंतीनिमित्त मूर्तीची स्थापना करण्यात आली यावेळेस सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य माजी सैनिक व वारकरी संप्रदाय व ग्रामस्थ उपस्थित होते.

# वीट येथील ढेरे यांच्या शेतात ऐन दुष्काळात पाच फुटावरच लागले पाणी



**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** करमाळा तालुक्यात दुष्काळाच्या झळा मोठ्या प्रमाणावर बसत आहेत. वाढलेली उष्णता आणि कमी झालेला पाऊस यामुळे विहिरी, कूपनलिका आटून गेल्या आहेत. अनेक गावात पिण्याच्या पाण्यासाठी टँकर सुरू आहेत. अशा परिस्थितीत मात्र वीट येथील उदय ढेरे यांच्या शेतात असलेले मोठे दगड काढत असताना झालेल्या खड्ड्यात पाणी लागल्याने सर्वत्र आश्चर्य व्यक्त केले जात आहे. विशेष म्हणजे या खड्डयात दररोज दोन ते तीन तास पाच एचपी मोटार चालत आहे. वीट (ता. करमाळा) येथून अडीच ते तीन किलोमीटर अंतरावर मोड व मोरवड रस्त्यांच्या बाजूला उदय ढेरे यांची शेती असून, या शेतात हे पाणी लागले आहे. दुष्काळी परिस्थितीत पाच फुटावर लागलेले पाणी पाहण्यासाठी ग्रामस्थांनी गर्दी केली आहे. विशेष म्हणजे या शेताजवळ आठ दहा किलोमीटरच्या परिसरात कोठेही तलाव किंवा अन्य पाण्याचा स्रोत नाही. या भागातील ६०० ते ७०० फुटापर्यंतचे बोअर कोरडे पडले आहेत, ७० ते ८० फुटापर्यंतच्या विहिरी आटल्या आहेत. उदय ढेरे हे उन्हाळी दिवस असल्याने शेतातील दुरुस्तीची कामे करत आहेत. ही कामे करत असताना शेतात असलेले मोठे मोठे दगड काढून हे दगड बाहेर कोठे ठेवायचे, म्हणून शेतातच मोठा खड्डा घेऊन हे दगड त्यात गाडण्याचे काम करत असताना दगड काढण्यासाठी खड्डा खोदत असताना या खड्डयांमध्ये पाणी आले, सुरवातीला असे वाटले की हे पाणी तात्पुरते असेल.

मात्र जास्त पाणी आले. दोन दिवसानंतर या खड्डयात चार फूट पाणी आले. सर्वत्र लोक पाणी पाणी करत असताना एवढ्या वरती पाणी लागल्याने उदय ढेरे यांनी खड्डयाची रुंदी वाढवली आणि थोडी खोली वाढवली. सर्वत्र विहिरी, बोअरचे पाणी आटले असताना पाच- सहा फुटावरती उदय ढेरे यांच्या शेतात लागलेले पाणी ही मोठी किमया मानली जात आहे.

आमची शेती दोन ठिकाणी आहे. मोरवडच्या बाजूकडील शेतात मोठे दगड आहेत हे दगड काढण्याचे काम सुरू होते. शेतात एवढ्या वरती लागलेले पाणी पाहून आम्हालाही आश्चर्य वाटले आहे. त्या दिवशी मोटारने पाणी काढल्यानंतर पुन्हा पाणी येणार नाही असे वाटले होते. मात्र, दुसऱ्या दिवशी पुन्हा तेवढेच पाणी आले. दुष्काळी परिस्थितीत सहज म्हणून घेतलेल्या खड्डयात लागलेल्या पाण्याने आम्ही समाधानी झालो आहोत.

**– उदय ढेरे,** शेतकरी, वीट, ता. करमाळा

दोन महिन्यांपासून वीटला पिण्याच्या पाण्यासाठी टँकर सुरू आहे. सर्वत्र विहिरी बोअर आटले आहेत अशा परिस्थितीत उदय ढेरे यांच्या शेतात खड्डयात पाणी लागले हे ऐकून आम्हाला सुरवातीला आश्चर्य वाटले आम्ही स्वतः जाऊन पाहिले तर खरोखरच उदय ढेरे यांच्या शेतात पाच ते सहा फुटावरती चांगले पाणी लागले आहे.

**– अंकुश जगदाळे,** वीट, ता. करमाळा

# मतदानाच्या दिवशी दिव्यांग मतदारांसाठी धावणार बस

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** मुंबई उपनगर जिल्ह्यात 20 मे रोजी लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातील मतदानाची प्रक्रिया पार पडणार आहे. त्यादृष्टीने 'एकही मतदार मतदानापासून वंचित राहू नये' या संकल्पानुसार जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांसाठी मतदानासाठी विशेष वाहतुकीची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. विधानसभा मतदारसंघानिहाय ठरविलेल्या एका निश्चित मार्गावर बेस्टमार्फत व्हिलचेअर प्रवेश योग्य मोफत बस सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असल्याची माहिती जिल्हा दिव्यांग समन्वयक अधिकारी प्रसाद खैरनार यांनी दिली. जिल्ह्यातील सर्वसामान्य मतदारांसोबतच दिव्यांग मतदारांना आपल्या मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राजेंद्र क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. जिल्ह्यात दिव्यांग पुरूष मतदार 9364 तर महिला दिव्यांग मतदार 6750, दिव्यांग तृतीयपंथी मतदार 2 असे एकूण 16 हजार 116 चिन्हांकीत दिव्यांग मतदार आहे. मतदान केंद्रावर जावून मतदान करता यावे यासाठी 1106 व्हिलचेअर मतदान केंद्रांवर उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या मतदारांना 613 ठिकाणाहून वाहतूक व्यवस्था पुरविण्यात येणार आहे. यासाठी एकूण 1106 स्वयंसेवकांची नियुक्ती देखील करण्यात आली आहे.

दिव्यांग मतदारांसाठी सुरू करण्यात आलेल्या स्वयंम ॲपबद्दल जिल्ह्यातील एकूण 13 हजार 888 दिव्यांग मतदारांना माहिती देऊन जनजागृती करण्यात आलेली आहे. मतदानाच्या दिवशी दिव्यांग मतदारांना कोणतीही अडचण येवू नये तसेच मतदानाची प्रक्रिया समजावून सांगणे आणि जनजागृती करणे यासाठी 25 सामाजिक तसेच अपंग संस्थांच्या समन्वयाने 85 मेळावे देखील घेण्यात आले आहेत. तसेच 1321 मतदारांना ब्रेल वोटर स्लीपचे वाटप करण्यात आले आहे. प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी दिव्यांग मतदारांसाठी 25 रिंगरूट व शटल रूटवर दिव्यांग सुलभ बसेस चालविण्यात येणार असून 613 ठिकाणी रिक्षा इको व्हॅनची व्यवस्था करण्यात आली असल्याचेही श्री. खैरनार यांनी कळविले आहे.

## कटूसत्य शब्दकोडे क्र. ६७

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ | ■ | ५ | | ६ | | ७ | ८ |
| ९ | | | ■ | १० | ११ | | ■ | | ■ | १२ | |
| | ■ | ■ | १३ | | | ■ | १४ | | ■ | १५ | |
| १६ | | १७ | ■ | १८ | | १९ | | ■ | २० | | ■ |
| | ■ | | ■ | | ■ | | ■ | २१ | | ■ | ■ |
| २२ | २३ | | २४ | ■ | २५ | | २६ | | ■ | ■ | २७ |
| २८ | | ■ | २९ | ३० | | ■ | ३१ | | | ३२ | |
| ३३ | | ■ | ■ | ३४ | | ■ | | ■ | ■ | | ■ |
| ■ | ३५ | | ■ | ३६ | | ■ | ३७ | ३८ | ३९ | | ■ |
| ४० | | ■ | ४१ | | ■ | ४२ | ■ | ४३ | | ■ | ४४ |
| | ■ | ४५ | | | ■ | ४६ | | ■ | ४७ | | |
| ■ | ४८ | | | ■ | ४९ | | ■ | ५० | | ■ | |

**उभे शब्द :** १) नगरचे भाजपचे खासदार २) पाऊस (इंग्रजीत) ३) संशय (हिंदीत) ४) लहान बाळाचे पाळण्यात नाव ठेवणे, बारसे ५) घाण, ** कचरा ६) बाजारात मिळणारे तयार गोड सरबत ७) उंचावरून पडणारा पाण्याचा प्रवाह ८) उलटी, ओकारी ११) शपथ (हिंदीत) १४) ऐकण्याचे इंद्रिय १७) पत्र १९) मुलीचा पती २०) बदक (इंग्रजीत), कड उलट लिहा २१) रात्र (इंग्रजीत) २३) नरक २४) एक हजार कि.ग्रॅ. म्हणजे एक ** २५) कुत्र्याचा जोडीदार २६) विक्षिप्त असे वर्तन करणारा २७) पावसापासून संरक्षणासाठी ही वापरतात ३०) वरल्या मनाने, वरवर ३२) भव्य, मोठे ३८) पातळ कालवण ३९) फेब्रुवारी (हिंदीत) ४०) टाकाऊ कागद ४१) दुर्ग, किल्ला ४२) बांग्लादेशचा फिरकी गोलंदाज- *** खान ४४) अकरा (इंग्रजीत) ४५) क्रिकेटमधील चौकार (इंग्रजीत)

**आडवे शब्द :** १) भारतीय क्रिकेट टीममधील एक माजी फलंदाज ५) सध्या संघात नसलेला भारतीय क्रिकेट टीममधील एक महाराष्ट्रीयन खेळाडू ९) सीतेचे वडील-राजा *** १०) एक रास १२) बॉंब (हिंदीत) १३) पौष्टीक, कसयुक्त १४) अक्षराच्या मागे येणारी उभी रेष १५) पैसा, संपत्ती १६) भव्य, भारतीय फलंदाज-*** कोहली १८) मुस्लिम बांधवांचा पवित्र सण किंवा पवित्र महिना २०) जेवणाचा टिफिन (मराठीत) २१) श्वसनेंद्रिय २२) विमान चालविणारा २५) छ. संभाजी महाराजांच्या आईचे नाव २८) खेळाडूंचा संघ (इंग्रजीत) २९) आश्चर्य ३१) वडाच्या झाडाचे स्त्रिया पूजन करतात तो सण ३३) सल उलट लिहा ३४) याच्यापासून शिरा बनवितात ३५) दहा (हिंदीत) ३६) हात, वस्तूवरील टॅक्स (मराठीत) ३७) भुईमुगाच्या शेंगेचे किंवा फळावरील आवरण ४०) धावणे (इंग्रजीत) ४१) फळातील गाभा ४३) कथेचा मूळ आशय, रसा उलट लिहा ४५) कालवण किंवा इतर पदार्थ बनविताना तेलात सर्व मसाला भाजून घेण्याची क्रिया ४६) एक म्हण-होता जिवा म्हणून वाचला ** ४७) लाकडाचे गोदाम ४८) राष्ट्रवादीचे संस्थापक-*** पवार ४९) मुस्लिम बांधवाचा एक सण ५०) माफी मागणे (इंग्रजीत)

**शब्दकोडे क्र. ६६ चे उत्तर**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| छ | बि | ना | ■ | म | म | ता | बॅ | न | र्जी | ■ | च |
| ग | ■ | शि | रू | र | ■ | प | ट | ■ | ■ | न | ट |
| न | जी | क | ■ | क | पा | ट | ■ | अ | न | वा | णी |
| भु | ■ | ■ | वे | ट | र | ■ | र | फ | ■ | ■ | ■ |
| ज | टा | यू | ■ | ■ | वा | म | न | रा | व | ■ | रा |
| ब | ■ | पी | ठ | ■ | ■ | का | ■ | त | र | बे | ज |
| ळ | ■ | ■ | ग | जा | न | न | ■ | फ | ण | स | ■ |
| ■ | आ | ठ | ■ | व | ग | ■ | दा | र | ■ | न | फा |
| ■ | त्म | ■ | ता | क | द | वा | न | ■ | स | ■ | र |
| र | वि | वा | र | ■ | ■ | च | व | दा | र | ■ | ■ |
| वि | श्वा | स | ■ | ल | हा | न | ■ | द | ब | द | बा |
| ■ | स | ■ | र | स्सी | ■ | ■ | भ | र | त | ■ | रा |


## Classified - छोटी जाहीरात

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

**-: संपर्क :-**
8083608083
9922646566
8698732109

**विकणे आहे**

सोलापूर शहरातील चांगल्या लोकवस्तीतील ST स्टॅन्ड व रेल्वे स्टेशन जवळ आवंतीनगर, शरद पवार शाळेजवळ, लोकमंगल ऑक्सिपार्क, येथील अ विंग मधील ७०४ नंबरचा फ्लॅट विकणे आहे.

**संपर्क:** 9881361260

(सरकार मान्य)

**अथर्व पेस्ट कंट्रोल**

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी

**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**

9822964815
9421984815

झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**शीतशवपेटी**

DEAD BODY FREEZER



काही कारणास्तव किंवा आपले लांबच्या पाहुण्यांसाठी मयत आपण काही वेळासाठी घरी ठेवत असतो. त्यासाठी बर्फाचे दिवस गेले आता लाईटवर चालणारे उपयुक्त शीतशवपेटी उपलब्ध...! प्रत्येक वेळेस सॅनिटाइज व हायजेनिक करून मिळेल.
संपर्क : गेंट्याल टॉकिज समोर, सो.म.पा. गाळा, अशोक चौक, सोलापूर
संपर्क : 9372576870

सुंदर दिसण्यासाठी व रोग निवारणासाठी

**शास्त्रोक्त मॉलिश**



**संपर्क : श्री. ज्ञानेश्वर सुरवसे,**
117, पावन गणपती शेजारी,
दमाणी नगर, सोलापूर **मो.: 8421062194**

**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**



दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश ..



(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)

**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**

फोन: 9552619752

कॉल / व्हॉटस्ॲप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...

501% रिझल्ट

**R.K कन्स्ट्रक्शन्स्**



संपर्क पत्ता :- इंजि. स्वप्निल पोपट कदम M.E. (Structure) B.E. (Civil)

Mo. 9552547272, 8788832033


वाचकांसाठी निवेदनः या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# शासकीय योजनांचा लाभ देतो म्हणून घातला 50 लाखाला गंडा

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** शासकीय योजनांचा लाभ मिळवून देतो म्हणून जवळपास ३४५ लोकांना अकलूज येथे एका तोतया पत्रकाराने गंडा घातला असून या बोगस पत्रकारावर गुन्हा दाखल व्हावा या मागणीसाठी भारतीय दलित महासंघाच्या वतीने उपविभागीय पोलीस अधिकारी अकलूज या ठिकाणी आमरण उपोषण करण्यात आले.



भारतीय दलित महासंघाचे संस्थापक अध्यक्ष संजीवदादा खिलारे यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रदेशाध्यक्ष दादासाहेब लोखंडे यांच्या नेतृत्वाखाली अकलूज येथील उपविभागीय कार्यालयासमोर या बोगस पत्रकारावर गुन्हा दाखल व्हावा या मागणीसाठी आमरण उपोषण करण्यात आले. यावेळी बोलताना दादासाहेब लोखंडे म्हणाले की, तोतया पत्रकार रमजान मुलानी यांनी सर्वसामान्य लोकांच्या अज्ञानपणाचा फायदा घेऊन त्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देतो म्हणून प्रत्येकाकडून वीस हजार ते जवळपास दोन लाखाच्या आसपास रक्कम घेऊन फसवणूक केली आहे. यामध्ये घरकुल, जेसीपी, शेळीपालन, पेट्रोल पंप, गुराचा गोटा, सिलिंग मधील जमीन, संजय गांधी योजना अशा अनेक योजनांच्या माध्यमातून त्यांनी लोकांकडून पैसे उकळले आहेत व या लोकांना त्यांनी सिक्युरिटी म्हणून कलेक्टरच्या डुप्लिकेट सहीचे पत्र देखील त्यांनी दाखवलेले आहे व त्याचबरोबर या लोकांना त्यांनी पंधरा लाख ते दहा कोटी पर्यंतचा चेक त्यांनी सिक्युरिटी म्हणून या संबंधित लोकांना दिला आहे. हा चेक लोकांनी जमा केल्यानंतर तो चेक बाऊन्स निघाल्यानंतर हा तोतया पत्रकार मात्र गायब झाला आहे. त्यामुळे भारतीय दलित महासंघाच्या वतीने संबंधित लोकांनी उपविभागीय पोलीस अधिकारी अकलूज कार्यालयासमोर उपोषण धरले. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी नारायण शिरगावकर यांना निवेदन देण्यात आले यावेळी त्यांनी संबंधित इसमावर गुन्हा दाखल करणार असल्याचे आश्वासन दिले. भारतीय दलित महासंघाचे प्रदेशाध्यक्ष दादासाहेब लोखंडे, तालुकाध्यक्ष गणेश खंडागळे, सचिव दिगंबर साठे, संतोष खंडागळे, आदम पठाण, बाबा पठाण, श्रीराज पठाण, सलामत पठाण, नागेश सावंत, स्वाती पोतदार, शौकत पठाण, प्रणिता वैद्य, संगीता गडदे, कांचन डहाणे, हिराबाई गोडसे, रफिक मुलानी,पद्मिनी चव्हाण यांच्यासह अनेक कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. लोकांना न्याय मिळेपर्यंत हा लढा चालूच राहील असे यावेळी बोलताना दादासाहेब लोखंडे यांनी सांगितले.

# श्री नागनाथ महाराज यात्रेनिमित्त कै.दत्तात्रय गोडसे यांच्या स्मरणार्थ पिण्याचे पाणी वाटप

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** श्री नागनाथ महाराज यात्रेमध्ये कै. दत्तात्रय चांगदेव गोडसे यांचे स्मरणार्थ अविनाश दत्तात्रय गोडसे, प्रशासन अधिकारी, ग्रामीण पाणी पुरवठा जिल्हा परिषद सोलापूर व सतिश दत्तात्रय गोडसे, सहाय्यक पोलीस निरीक्षक, (भाईदर) मुंबई यांचेतर्फे यात्रेकरुना पिण्याच्या पाण्याची सोय करणेत आली.



यात्रेकरूना पाणी वाटप आनंद कुमार मिरगणे, गट विकास अधिकारी पंचायत समिती मोहोळ बाळासाहेब गायकवाड माजी उपसभापती पंचायत समिती मोहोळ, बप्पा देशमुख, सुधीर गायकवाड प्राचार्य कन्या प्रशाला मोहोळ यांचे शुभहस्ते करण्यांत आले. सदर प्रसंगी सुनिल गायकवाड, कारभारी गायकवाड, अविनाश गोडसे, आसावरी गोडसे, आदेश गोडसे, श्लोक गोडसे, जान्हव्ही गोडसे, विभावरी गोडसे, माहेश्वरी गोडसे, वैष्णवी चव्हाण, शिवदत्त चव्हाण, सोमेश्यर शेंडे, राजेश देशपांडे, प्रसाद देवळे, विलास पाटील, दिगंबर व्होनमाने, बाहुबली खडेकर, आदि उपस्थित होते. यात्रेकरूनी गोडसे बंधू ना पाणी वाटप केलेबद्दल शुभेच्छा दिल्या.

## तीर्थक्षेत्र विकासाचे पर्व मंडळाकडून सुरु - संजयकाका पाटील

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली तीर्थक्षेत्र विकासाचे पर्व मंडळाकडून सुरु असल्याचे मनोगत सांगलीचे खासदार संजयकाका पाटील यांनी व्यक्त केले. ते तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात सहकुटुंब आले असता न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. न्यासाचे एस. के.स्वामी, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, नामा भोसले, बाळासाहेब घाडगे, दत्ता माने, मल्लिनाथ कोगणुरे, शिवकुमार स्वामी, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, देवराज हंजगे, यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.



# दहावीच्या निकालात सोलापूरच्या ऑर्किडची भरारी



1 st - JAYESH PANDE 97.2 %
2 nd - D SARVESH 96.8 %
3 rd - REVATI MENASGI 95.6 %



4 th - YUVRAJ SOMANI 95.4 %
5 th - RISHIKA DARGAD 94.2 %

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** इयत्ता दहावीची परीक्षा म्हणजे आयुष्यातील पहिला महत्त्वाचा टप्पा. हा टप्पा यशस्वीरित्या पार करून ऑर्किडच्या गुणवंत विद्यार्थ्यांनी शाळेचा निकाल उंचावला आहे. सीबीएसई माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा ऑनलाईन निकाल जाहीर झाला असून यात सोलापूर शहरातील नागेश करजगी ऑर्किड स्कूलने उज्ज्वल निकालाची परंपरा कायम ठेवली आहे.या परीक्षेत शाळेतील विद्यार्थी जयेश पांडे हा ९७.२० टक्के गुण मिळवून प्रथम आला आहे. तर डी. सर्वेश हा ९६.८० टक्के गुण घेऊन द्वितीय व रेवती मेनसगी ही ९५.६० टक्के गुण मिळवून तिसरी आली आहे.या परीक्षेत एकूण ८१ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. परीक्षेत प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांपैकी विशेष प्राविण्य श्रेणीत ५४ तर प्रथम श्रेणीत १४ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. स्कूलमधील विद्यार्थ्यांच्या या यशासाठी प्राचार्या रुपाली हजारे, हिना पटेल, स्वाती कोकाटे, राजेश्वरी शिरकणहळळी, तुलसाश्री चितारी, तहसीन शेख, इमरान सय्यद, अमित वाले, अनुजा सुसलादी, भाग्यश्री नंदी, श्रीकांत जोशी, आनंद लिगाडे, विकास गोसावी आदी शिक्षकवृंद व पालकांनी परिश्रम घेतले. गुणवंत विद्यार्थी व शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. कुमार दादा करजगी, सचिवा वषार्ताई विभुते, व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी, प्राचार्या रुपाली हजारे, पूर्व प्राथमिक विभागाच्या प्राचार्या अनिता अनगोंडा यांनी अभिनंदन केले.

# पशुपालकांनी जनावरांची नोंद भारत पशुधन प्रणालीवर करून घेण्याचे आवाहन

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** तालुक्यातील सर्व पशुपालकांनी जनावरांचा एअर टॅगिंग करून आणि त्याचे भारतीय पशुधन प्रणालीवर नोंद बंधनकारक करण्यात आली आहे त्यामुळे तालुक्यातील पशुपालकांनी जनावरांची नोंद भारत पशुधन प्रणालीवर करून घ्यावे असे आव्हान सहाय्यक आयुक्त तालुका लघु सर्व रोग चिकित्सालय अक्कलकोट यांनी आयोजित पत्रकार परिषदेत माहिती दिली आहे.



महाराष्ट्र राज्याचा अक्कलकोट तालुक्यातील कृषी पशुसंवर्धन दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभागाने याबाबत शासन निर्णय निर्गमित केला आहे त्यानुसार भारत पशुधन प्रणालीवर पशुपालकांची सर्व माहिती जनावरांचे वय लिंग जात मिल्किंग स्टेट्स मोबाईल नंबर आधार नंबर आधी माहिती अध्यावत करण्याकामी सर्व पशुपालकांनी आपल्या जनावरांना इयर टॅगिंग करणे बंधनकारक आहे.

एक जून 2024 पासून अद्यावत इयर टॅग आणि भारत पशुधन प्रणालीवर नोंदी शिवाय जनावरांची खरेदी विक्री करता येणार नाही तसेच पशुवैद्यकीय सेवा केंद्र आणि राज्य शासनाकडून आर्थिक सहाय्य मिळणार नाही अशी स्पष्ट करण्यात आले आहे.

त्याचबरोबर विजेचा धक्का वन्य पशूचा हल्ल्यामुळे मृत्यू मुखी पडलेल्या पशुधनास नुकसान भरपाईची रक्कम देण्यात येणार नाही राज्यांतर्गत जनावरांची वाहतूक आणि मालकी हस्तांतरण होणार नाही म्हणून भारत पशुधन प्रणालीवर जनावरांची नोंद करणे बंधनकारक आहे. म्हणून तालुक्यातील सर्व पशुपालकांनी आपल्या जनावरांना नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधून इयर टॅगिंग करून घ्यावे आणि त्याचा अचूक नोंदी भारत पशुधन प्रणालीवर तात्काळ नोंद करून घ्यावेत असे आवाहन आयोजित पत्रकार परिषदेत सहाय्यक आयुक्त तालुका लघु सर्व रोग चिकित्सालय अक्कलकोट यांनी केला आहे.

# रामदास चवरे यांनी स्वखर्चातून सुरू केला पेनूर व पाटकुल ग्रामस्थांसाठी पाणीपुरवठा

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** लोकनेते शुगरचे चेअरमन बाळराजे पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पेनुर व पाटकुल गावातील जनतेसाठी ग्रामपंचायत सदस्य रामदास चवरे यांनी मोफत पिण्याच्या पाण्याचे टँकर सुरू केले आहेत. सध्या सर्वत्र दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे पेनुर व पाटकुल गावातील लोकांना पिण्याच्या पाण्यासाठी दूरवर भटकंती करावी लागत आहे, विहिरीला व बोअर ला पाणी नसल्यामुळे लोकांना तसेच जनावरांना पाणी पिण्यासाठी उपलब्ध नसल्यामुळे रामदास चवरे यांनी पेनुर व पाटकुल गावातील लोकांसाठी स्वखर्चाने पिण्याच्या पाण्याचे टँकर चालू केले आहेत.



**लोकनेते परिवाराच्या माध्यमातून पेनूर परिसरातील लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी मी कटिबद्ध**

माजी आमदार राजन पाटील, मोहोळ मतदार संघाचे आमदार यशवंत माने व लोकनेते शुगरचे चेअरमन बाळराजे पाटील,अजिंक्यराणा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विविध सामाजिक उपक्रम राबवत आहे. सध्या सर्वत्र दुष्काळग्रस्त परिस्थिती असल्यामुळे मी माझे कर्तव्य म्हणून पिण्याच्या पाण्याचे टँकर चालू केले आहेत, येत्या काळात लोकनेते परिवाराच्या माध्यमातून पेनुर परिसरातील लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी मी कटिबद्ध राहणार आहे

**- रामदास चवरे,** ग्रामपंचायत सदस्य पेनूर

रामदास चवरे हे गावातील नागरिकांच्या समस्या जाणून त्या समस्या सोडवण्याचा प्रयत्न करत असतात. त्यांनी अनेक वेळा गावातील नागरिकांना मदत केली आहे ते अनेक विविध सामाजिक उपक्रम राबवत असतात. यापूर्वीही त्यांनी 2016 -17 साली दुष्काळग्रस्त परिस्थिती असताना पिण्याच्या पाण्याचे टँकरने मोफत वाटप केले होते.त्यांच्या या उपक्रमामुळे गावातील लोकांकडून त्यांचे कौतुक होत आहे. पाण्याच्या टँकर चा शुभारंभ ज्येष्ठ नेते प्रकाश कस्तुरे, पेनुरचे माजी सरपंच हरिश्चंद्र चवरे, बाजार समितीचे संचालक सज्जन चवरे, पाटकुल चे सरपंच शिवाजी भोसले, माजी सरपंच सुनील सातपुते, वसंत चौधरी सर, राजाराम आढेगावकर, पेनुरचे उपसरपंच सागर चवरे, सचिन चवरे, महावीर भोसले, राजू सलगर, संजय देशमुख, दादाराव सलगर, संजय शिंदे, दिलीप काळे, दादाराव गावडे, रामदास सातपुते, विष्णू लोंढे, राहुल वसेकर, मुन्ना चौधरी, अनिल चवरे, शिवाजी आवारे, अशोक लवटे, किरण माने, आनंद आवचारे, दगडू पठाण, तानाजी लवटे, भारत माने, अभिराज जमदाडे, जीवन पुजारी, बालाजी चवरे, अण्णा सातपुते, सुहास सातपुते, अभिमान शिंदे, अभिजीत लोखंडे, दादाराव आढेगावकर, किशोर सातपुते, ज्ञानेश्वर माने, चंद्रकांत धोत्रे, सुहास परदेशी, सज्जन लोंढे, श्रीकांत धोत्रे, किरण हाके, संभाजी कदम, रोहन माने, नागेश लोंढे, चेतन टेकळे, सुधीर मांदे, विवेक गवळी, सर्जेराव पवार, समीर मुजावर यांच्यासह बहुसंख्य पेनूर व पाटकूल ग्रामस्थ उपस्थित होते.

# शिरूर लोकसभा मतदार संघातील पिंपरी दुमाला येथील मतदान केंद्रावर पोहचल्या 99 वर्षाच्या आजीबाई

**शिरूर (कटूसत्य वृत्त):-** वयाची 99 वर्ष पार केलेले यमुनाबाई गुलाबराव सोनवणे व वयाची 90 वर्ष पार केलेल्या हिराबाई गुलाबराव चिखले यांची मुले सत्तरीत पोहोचलेले तर नातू ४० पार केली आहे. अशा या सर्वांनी आज लोकसभेच्या निवडणुकीत आज मतदान करीत संविधानाने दिलेला अधिकार बजावत लोकशाहीचा वारसा जपला. शिरूर लोकसभा मतदारसंघातील पिंपरी दुमाला गावात हा योग जुळून आला होता.



शिरूर लोकसभेतील महत्त्वाचं संपूर्ण कृषीप्रधान गाव असल्यामुळे अधिक चर्चेत आलेले गाव. या गावातील सोनवणे परिवारातील व चिखले परिवारातील परिवारातील यमुनाबाई गुलाबराव सोनवणे व हिराबाई गुलाबराव सोनवणे या दोन्ही आजींनी 90 व 100 वर्ष पूर्ण केले आहे. यमुनाबाई गुलाबराव सोनवणे यांना मुलगा मुलगी असा परिवार असून हिराबाई गुलाबराव चिखले यांना चार मुले आहेत या दोन्ही आजींच्या कुटुंबीयांनी आज पिंपरी दुमाला येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत आज मतदान केले.

सोनवणे यांना यांना आज मतदानासाठी जायचं असल्यामुळे सकाळी नऊ वाजता तयार होऊन बसले होते दोन्हीही आजींच्या नातवाने आपल्याला दहा वाजता मतदानाला जायचे आहे असे सांगून अतिशय उत्साह मध्ये लोकशाहीच्या उत्सवांमध्ये सहभाग नोंदवण्यासाठी मतदान केंद्रावर पोहोचले

यावेळेस मतदान केंद्रावर ती अनेक नागरिकांनी आपला महत्त्वाचा मतदानाचा अधिकार बजावला यामध्ये प्रामुख्याने उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे विशालराव सोनवणे बापूराव शेळके सदाशिव चिखले आदित्य चिखले अमोल दुर्गे रोहन पाटेकर संदीप खळदकर पिंपरी दुमाला शाळेचे आदर्श शिक्षक कांताराम शिंदे सर आदींनी मतदानाचा अधिकार बजावला

हा परिसर शिरूर लोकसभा मतदार संघात आहे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटा कडून डॉ अमोल कोल्हे उभे आहे तर राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून शिवाजीराव आढळराव पाटील उभे आहेत लोकसभा मतदारसंघांमध्ये चुरशीची लढत पार पडत आहे

वाढत्या वयाबरोबर शरीर क्षीण होत चालले आहे परंतु दोन्ही आजींमध्ये असलेला उत्साह त्यांना अद्याप आपली गोष्ट आपण करण्याचा त्यांचा आग्रह असतो या दोन्हीही आजीबाईचा उत्साह पाहून आज रोजी संपूर्ण पिंपरी दुमाला मध्ये मतदानाची प्रक्रिया पार पडत असताना येथे पिंपरी दुमाला मध्ये सकाळी

वेळः-7:00 ते 6:00
पुरुषः-353
स्त्री :-310
एकूण मतदान :-663
एकूण टक्केवारी :-81:95

अशा पद्धतीने जवळपास 82% चा निर्णायक टप्पा शांततेत पार पडला

# यशस्वी व्यावसायिक बनण्यासाठी ध्येय, जिद्द, चिकाटी आवश्यकः श्री.ष.ब्र. विश्वाराध्य मळेंद्र शिवाचार्य महास्वामीजी

## वळसंग वाडा यांच्या फंटूश वॉटर पार्कचे मोठ्या थाटात शुभारंभ

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** यशस्वी उद्योजक बनण्यासाठी ध्येय, जिद्द, चिकाटी आवश्यक आहे कष्ट करा ध्येय ठेवा यशस्वी उद्योजक व्हा उद्योग कितीही छोटा किंवा मोठा असला तरी त्याचा लाज न बाळगता पुढे जाता आला पाहिजे. याचं उत्तम उदाहरण म्हणजे सुनील बाबानगरे हे आहेत.व्यवसायात क्वालिटी आणि कमिटमेंट असणे गरजेचे आहे वळसंग वाडाचे सुनील बाबानगरे यांनी वळसंगचे नांव देशपातळीवर पोहोचवण्याचे काम केले आहे. शेकडो बेरोजगार युवकांना हॉटेल व्यवसायाच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध करून दिला असं आशीर्वाचन वळसंग वाडा येथील फंटूश वॉटर पार्कच्या शुभारंभ प्रसंगी अफजलपुर मठाचे श्री.ष.ब्र. विश्वाराध्य मळेंहद्र शिवाचार्य महास्वामीजीनीं केलं. दरम्यान सोलापूर अक्कलकोट रोड वरील वळसंग टोलनाका परिसरात वळसंग वाडा यांनी सोलापूरकरांसाठी मनोरंजानांचे उत्कृष्ट माध्यम म्हणून वाटर पार्कची निर्मिती केली असून याचे उद्घाटन सोमवारी सायंकाळी पार पडला यावेळी अफजलपुर मठाचे मठाधिपती श्री विश्वराध्य मळेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या शुभहस्ते फीत कापून कोनशीला अनावरण करून दीप प्रज्वलनाने करण्यात आले. यावेळी माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे, युवा नेते रमेश पाटील, शावर अँड टॉवरचे संचालक विश्वराज चाकोते, युवा उद्योजक यश डोंगरे, वळसंगचे सरपंच जगदीश अंटद, माजी सरपंच श्रीशैल दुधगी, वळसंग पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल सनगल्ले, आर्किटेक्कर संतोष भंडारे, मल्लिनाथ बाबानगरे, वेदमूर्ती पंडित हिरेमठ, बिराजदार आदींची प्रमुख उपस्थितीत होते. यावेळी महास्वामीजींची पादपूजा सुनील बाबनगरे आणि सौ अनुपमा बाबानगरे यांनी केले उपस्थित मान्यवरांचा शाल, श्रीफळ, स्मृतीचिन्ह देऊन बाबानगरे परिवाराच्या वतीने करण्यात आला. यावेळी बोलताना माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे म्हणाले की, ज्या क्षेत्राची आवड आहे ज्या क्षेत्रामध्ये माहिती आहे त्या क्षेत्रात तुम्ही गेला तर हमखास यशस्वी व्हाल सुनील बाबानगरे यांनी वळसंग वाड्यांचे नाव आज देशभर पोचवला आहे उच्चशिक्षित असून देखील हॉटेल व्यवसाय मध्ये आज ते यशस्वी झाले. आता फंटूश वॉटर पार्क च्या माध्यमातून लोकांना मनोरंजनाचा थरार अनुभवण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे.त्यांच्या पुढील कार्यास आमच्या शुभेच्छा असल्याचेही ते म्हणाले. या वॉटर पार्कमध्ये रेन डान्स, मल्टीस्लाइडस, बुल राइड्स, बाईक राइड्स यासह अनेक मनोरंजनात्मक सोयी सुविधांनी हे वाटर पार्क असल्याचे यावेळी सुनील बाबानगरे म्हणाले. यावेळी बाबानगरे परिवार यांना शुभेच्छा देण्यासाठी सर्व क्षेत्रातील अनेक मान्यवर ग्राहकांनी उपस्थिती लावून शुभेच्छाचा वर्षाव केला. मोठ्या थाटात फंटूश वॉटर पार्कचे उद्घाटन पार पडला. या सोहळयास वळसंग पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रेवणसिद्ध प्याटी यांनी केले तर सूत्रसंचालन बमलिंग चिट्टे यांनी केले.



# स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त राष्ट्रवादीचे अभिवादन

## श्री शंभोः शिवजातस्य मुद्राद्यौरिव राजते। यदंकस्येविनी लेखा वर्तते कस्यनोपरि।।

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आपल्या थोर वडिलांच्या विचारांवर चालून स्वराज्याचा गाडा यशस्वीपणे पुढे हाकणारे प्रजाहितदक्ष राजे, असीम शौर्याच्या बळावर स्वराज्याचा विस्तार करणारे, मुघल साम्राज्याला हादरवून सोडणारे धुरंदर राजकारणी, प्रकांड पंडित, कुशल संघटक, स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांना जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले ..याप्रसंगी जिल्हाध्यक्ष संतोष भाऊ पवार कार्याध्यक्ष जुबेर भाई बागवान जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले ज्येष्ठ नेते बिज्जु अण्णा प्रधाने श्रीनिवास कोंडी हेमंत चौधरी सलीम नदाफ अनिल उकरंडे प्रकाश जाधव अमीर शेख अनिल छत्रबंध अलमेराज आबादिराजे सोमनाथ शिंदे शत्रुघ्न माने निलेश कांबळे प्रज्ञासागर गायकवाड इरफान शेख वैभव गंगणे सुजित अवघडे विनय रायकर अर्जुन माळी दीपक जगताप अनिकेत प्रधाने संकेत क्षीरसागर अनिकेत सुरवसे, महिला पदाधिकारी कार्याध्यक्ष चित्रा कदम समन्वयक शशिकला कस्पटे महिला प्रदेश सरचिटणीस लता ढेरे प्रिया पवार ज्योती शटगार संगीता घाडगे आदी पदाधिकारी उपस्थितीत होते.



# शिवछत्रपती सार्वजनीक वाचनालयाचे नवीन इमारतीत स्थलांतर

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** येथील शिवछत्रपती सार्वजनीक मोफत वाचनालयाचे अनगर सिद्ध मंदिरासमोरील प्रशस्त हवेशीर नवीन इमारतीत आज लोकनेते साखर कारखान्याचे अध्यक्ष विक्रांत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रांताधिकारी सदाशीव पडदुणे यांच्या हस्ते फीत कापून उद्घाटन करून स्थलांतर झाले. प्रारंभी अध्यक्ष प्राचार्य चंद्रकांत ढोले यांनी उपस्थितांचे स्वागत करून वाचनालयास मोफत प्रशस्त हवेशीर जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल माजी आमदार राजन पाटील यांचे आभार मानले. या प्रसंगी विक्रांत पाटील यांचा वाढदिवस केक कापून साजरा केला. त्यांचा सत्कार प्रांत सदाशीव पडदुणे यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी बालाजी पंडित, प्राचार्य चंद्रकांत ढोले, माधव खरात, महादेव चोपडे, प्रितम कुलकर्णी, नागनाथ ढोले, पांडुरंग माने, सत्यवान दाढे, रवी पाचपुंड, महादेव माने आदींसह वाचक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.



अनगर येथील शिवछत्रपती सार्वजनीक मोफत वाचनालयातील नूतन इमारतीच्या उद्घाटन प्रसंगी लोकनेते साखर कारखान्याचे अध्यक्ष विक्रांत पाटील, प्रांत सदाशीव पडदुणे, प्राचार्य चंद्रकांत ढोले आदींसह वाचक